
वाराणसी
शुभम शरद पाटील

**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# वाराणसी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

पण तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# वाराणसी

(प्रवासवर्णन)

लेखक : शुभम शरद पाटील

# वाराणसी

लेखक - शुभम शरद पाटील

फोन नंबर - +९१ ९८२३३ ८६३११

ईमेल - shubhampatil111295@gmail.com

वेबसाईट - https://grabcad.com/shubham.patil-10

पत्ता - १. कमलानंद, ३४, डॉ. हेडगेवार नगर, धरणगांव,(४२५१०५) जिल्हा - जळगांव

२. श्री स्वामी समर्थ नगर भातखंडे बु.।। (४२४२०१)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such

works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ जानेवारी २०२१ (मकरसंक्रांती)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# शुभम शरद पाटील



फोन नंबर - +९१ ९८२३३ ८६३११
ईमेल - shubhampatil111295@gmail.com
वेबसाईट - https://grabcad.com/shubham.patil-10
पत्ता - १. कमलानंद, ३४, डॉ. हेडगेवार नगर, धरणगांव,(४२५१०५)
जिल्हा - जळगांव २. श्री स्वामी समर्थ नगर भातखंडे बु.।। (४२४२०१)
शिक्षण - BE Mechanical

i Automotive Systems मध्ये Process Design Engineer आहे. रेसिंग कर डिझाइनचा अनुभव असून आताही बाहेरील प्रोजेक्ट डिझाईन साठी घेत असतो. Catia V5 आणि Keyshot या सॉफ्टवेअर साठी ऑनलाइन Tutorials लिहीत असतो. ऐतिहासिक पुस्तके आणि वारसा स्थळांबद्दल आवड आहे. मोडी लिपीची विशेष आवड आहे. वेळ मिळेल तसे मोडी लिप्यांतर करत असतो. मोडी बाराखडी लिहिण्याबद्दल माहितीपर पुस्तकाचे लिखाण सुरू आहे. लवकरच ई साहित्य वर प्रकाशित करण्याबद्दल प्रयत्नशील आहे.

## मनोगत

नमस्कार, मी शुभम शरद पाटील. ई साहित्य चा नियमित वाचक आहे. तशी वाचनाची आवड लहानपणापासूनच आहे. ई साहित्यवरील माझे हे पहिलेच पुस्तक (प्रवासवर्णन). आजच्या या आंतरजालाच्या काळात प्रवासवर्णन वगैरे वेळखाऊ असते असे म्हणतात कारण विविध बॅकपॅकर्स आणि फूड ब्लॉगर्स यांच्या व्हिडिओमधून आपल्याला बरीच आगाऊ माहिती मिळून जाते. पण माझ्या मते भावना किंवा अनुभव व्यक्त करण्यासाठी पुस्तक हेच सर्वश्रेष्ठ माध्यम आहे. फिरण्याची आवड तर आधीपासूनच आहे. पण फिरायचे कशासाठी हा बऱ्याच जणांना पडलेला प्रश्न आहे. प्रवासात आपल्याला असंख्य वेगळ्या जागा, माणसं भेटतात त्यांच्याकडे बघून आपण आपल्या सेफ झोन मधून बाहेर पडतो आणि आपल्यातील आत्मविश्वास वाढतो. मी प्रवासाच्या गंतव्य ठिकाणी पोहोचल्यावर शक्य असल्यास पायी किंवा पब्लिक ट्रान्सपोर्टने फिरण्याचा प्रयत्न करतो. विविध

माणसे, त्यांच्या चालीरीती, खानपान, तेथील इतिहास, एखाद्या विशिष्ट ठिकाणची आख्यायिका हे समजून घेताना घेताना एक वेगळ्याच अनुभवाची शिदोरी सोबत येते.  ताणतणाव कमी करण्यासाठी प्रवास हे एक उत्तम साधन आहे. फिरायला भरपूर पैसे लागतात असे मुळीच नाही. होस्टेल किंवा काऊट सर्फिंग मध्ये भरमसाठ पैसे वाचतात. उलट एकट्याने फिरण्यात अशा काही गोष्टी करता येतात ज्या कुणी सोबत असताना नाही करता येत. जसे की अचानक नियोजनात बदल करायचा असल्यास आपण स्वतः निर्माण घेऊन मोकळं होतो. या प्रवासासाठी माझे जवळपास एक महिन्यापासून नियोजन सुरू होते. त्यामुळे कुठेही काहीही अडचणी आल्या नाहीत कारण त्यासाठी पर्याय नियोजनाच्या वेळीच ठरवला होता. अशा या तीन दिवसांच्या माझ्या वाराणसीच्या पर्यटनाचा अनुभवाचा हा छोटासा लेखनप्रपंच !

बहुत काय लिहिणे, तुम्ही सुज्ञ असा..!!!

## अर्पणपत्रिका

**...आणि अर्थातच हा सुंदर निसर्ग बनविणाऱ्या**

**सर्वशक्तिमान विधात्यास**

# नखशिखांत आसेतूहिमाचल

## वाराणसी

शुभम् शरद पाटील



## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

नमस्कार, वाराणसी २.० म्हणजे माझ्या पहिल्या पुस्तकाची (प्रवासवर्णनाची) दुसरी आवृत्ती. गेल्यावर्षीच्या मकरसंक्रांतीला 'ई-साहित्य'तर्फे माझं पहिलं पुस्तक प्रकाशित झालं होतं. पहिलं पुस्तक लिहिलं ते फावल्या वेळेत, म्हणजे बसस्टॉपवर बसची वाट बघत असताना जेवढा वेळ मिळायचा तेवढ्या वेळेत वाराणसी साकारलं. पहिलंच लिखाण असल्याने वाचकवर्गाला आवडेल की नाही? याची धाकधूक होतीच. पण वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला आणि आत्मविश्वासाने गरुड भरारी घेतली. वाचकांचा प्रतिसाद येत होता आणि आत्मविश्वास वाढत होता. आपण लिहू शकतो याची खात्री झाली आणि मग वर्षभरात पाच दिवसात मोडी शिका, लॉकडाउन १.० यांचं लिखाण पूर्ण झालं. शिवाय प्रकाशितसुद्धा लगेचच झालं. या दोन्ही पुस्तकांनासुद्धा प्रचंड प्रतिसाद मिळाला. याबद्दल श्री सुनीळ सामंत सर आणि संपूर्ण ई-साहित्य टिमचे मनापासून आभार. त्यांनी वेळोवेळी केलेलं सहकार्य खरंच खूप मोलाचं आहे. किंबहुना त्यांच्याशिवाय हे शक्य नव्हते.

"तुमचं पुस्तक वाचताना आम्हीच वाराणसीत फिरत होतो, वाराणसी फिरून आल्यासारखं वाटलं" अशा पद्धतीचे शेकडो मेल्स, मेसेज आणि फोन आले. वाचकाने पुस्तकाच्या नायकाची जागा घेऊन पुस्तक अनुभवणे हाच खरा लेखकाचा विजय असतो, असं मला वाटतं. जर ते खरं असेल तर विजयश्रीने गळयात माळ घातली असं म्हणण्यास हरकत नाही. वाराणसीची पहिली आवृत्ती काही अंशी अपूर्ण होती असं मला नेहमी वाटत होतं. काही गोष्टी अव्यक्त होत्या आणि त्या व्यक्त करणं मला आगत्याचं वाटलं. उदाहरणार्थ सद्यस्थितीत विश्वेश्वर मंदिरात असलेल्या शिवलिंगचा इतिहास, गंगा आरती, राजा हरिश्चंद्राची गोष्ट, मला वाराणसीत भेटलेल्या दोन मित्रांनी केलेली भारताची स्तुती, श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणीत) यांचे अभूतपूर्व कार्य आणि शेकडो किलोमीटर दूर येऊन देशासाठी करत असलेले अनुष्ठान, वाराणसी सोडताना भावुक झालेलो मी..... अशा अनेकविध गोष्टी पहिल्या आवृत्तीत सांगायच्याच राहून गेल्या.

वाराणसी...बनारस...काशी...महास्मशान... इतिहासाच्या आधी वसलेलं महानगर. सोळा महाजनपदांपैकी एक. पवित्र गंगेच्या काठी असलेलेले घाट अजूनही भारताच्या हजारो वर्षांच्या जाज्वल्य

इतिहासाची साक्ष देत दिमाखात उभे आहेत. हिंदुस्थानाचेच नव्हे तर जगाच्या पर्यटनाचे आकर्षण असलेले बॅकपॅकिंग डेस्टीनेशन. प्रचंड जुनं आणि तेवढंच मॉडर्न असलेलं महानगर... मी इथं तीन दिवसांच्या सोलो बॅकपॅकिंगला गेलो तेव्हाचे अनुभव.  काही चांगले तर काही वाईट... अयोध्या निकलच्या दिवशी नेमका बहुसंख्य मुस्लिम बांधव असलेल्या भागात भरकटलो तेव्हाचा अनुभव, गंगा आरतीचा अनुभव असे सर्व अनुभव एकत्र बांधून त्यांचं गाठोडं तुम्हाला दिलं आहे. मनात साठवलेले काही क्षण, या क्षणांनासुद्धा शेकडो वर्षांचा इतिहास आणि यांच्या जादूत पूर्ण जग समवलेलं आहे. वाराणसी हे काही विशिष्ट अशा कुणाचं नाही, ते सर्वांचं आहे. किंबहूना वाराणसी म्हणजे जगाचं प्रोटोटाइप आहे.

चला तर मग माझ्या शब्दांत – आवाजात – वाचा - ऐका माझी सोलो बॅकपॅकिंग इन वाराणसी

ह्या गोष्टी सांगायच्या म्हणून दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्याच्या विचार आला आणि सामंत सरांना विचारलं. सरांनी लगेचच होकार दिला आणि मग परत एकदा सुरुवात केली.

कळविण्यास अत्यंत आनंद होतोय की या आवृत्तीचे “ऑडिओबुक”सुद्धा आजच प्रकाशित होतेय. येणारा कल हा ई-बुक आणि ऑडिओबुकचा असणार आहे, हे सांगायला कुणा ज्योतीष्याची गरज नाही हे

मात्र नक्की. ऑडिओबुक बनवताना एक वेगळाच आणि प्रसन्न अनुभव आला. त्यात वेगवेगळे साऊंड इफेक्ट्स, बॅकग्राऊंड इफेक्ट्स समाविष्ट केले आणि 'कानगोष्टी'ला सोन्याची झळाळी प्राप्त झाली.

प्रस्तावना खूप लांबली त्याबद्दल क्षमस्व. इति लेखनसीमा.

शुभम शरद पाटील.

१४ जानेवारी २०२१

(मकरसंक्रांती)

“गोदौलीया चलोगे?”

“जी हां चलीये.”

“कितना समय लगेगा?”

“कुछ नाही जी दस मिनिट मे चले जाओगे.”

मी व्यवस्थित बॅग ठेऊन ई रिक्षात बसलो, आम्ही तिघेजण होतो, त्यांनापण तिकडेच जायचे होते. इतक्या सकाळीसुद्धा चहा बनवायला सुरुवात झाली होती. पहाटेची वेळ असल्याने रस्त्यावर जास्त वर्दळ नव्हती. ड्रायव्हर लोकांनी आपापली वाहनं पुसायला सुरुवात केली होती. मी रस्त्यावरील गंमत बघत होतो, नागमोडी वळणं घेत रिक्षा वेगाने अंतर कापत होती.  दहा मिनिटात गोदौलीया चौक आले. ड्रायव्हर ने आवाज दिला तसा मी भानावर आलो.

“कितने हुए?”

“जी दस रुपये, सामनेसे आपको अस्सी घाट के लिये गाडी मिल जाएगी.”

“जी धन्यवाद.”

गोदौलीया चौकातून पुढे गेल्यावर अस्सी घाट, लंका येथे जाण्यासाठी वाहतुकीची साधने उपलब्ध असतात. तिथे एक तीन चाकी सायकलला हात देऊन बसलो. सकाळचे पाच वाजले होते, वाराणसीचा थंड वारा शरीराचीच नव्हे तर मनाची मरगळही सोबत घेऊन जात होता. तब्बल २१ तासांचा रेल्वेचा कंटाळवाणा प्रवास करून मी वाराणसीला पोहोचलो होतो. (भारतीय रेल्वेचे विशेष आभार, गाडी वेळेत पोहोचविल्या बद्दल) तसं माझं आरक्षण वाराणसी जंक्शन पर्यंतच होते, पण मी काशी स्टेशनलाच उतरलो, याने माझा भरपूर वेळ वाचला. माझे सहप्रवासी मूळ वाराणसीच्या आसपासचे असल्याने त्यांना कुठे उतरणं सोईचं ठरेल? हे विचारणं फायद्याचं ठरलं. काशी स्टेशन ते वाराणसी जंक्शन हे अंतर सुमारे ४ किलोमीटरचे आहे, पण गाडीला सिग्नल मिळेपर्यंत खुप वेळ लागतो. त्यामुळे इथे उतरणे केव्हाही सोपे आहे. प्रवासात पुलंचे ‘गोळाबेरीज’ आणि चिं. वि. जोशींचे ‘चिमणरावांचे च-हाट’ असल्याने बराच वेळ प्रवास चांगला झाला. मी प्रवासात

नेहमी पुलंची पुस्तके किंवा अभिवाचन बाळगून असतो. पुलंची पुस्तके वाचताना किंवा अभिवाचन ऐकताना आपण देखील त्याच चष्म्यातून बघायला लागतो, आणि गंमत म्हणजे ती पात्रेदेखील काही अंशी खरीच वाटतात.

सकाळचे पाच वाजले होते. सम्पूर्ण वाराणसी साखर झोपेत होते. थंडी तशी जास्त नव्हती पण गार वारा अंगाला झोंबत होता. गंतव्य ठिकाण सुमारे ०३ किलोमीटर दूर होते. आम्ही हळूहळू रस्ता कापत होतो. अर्ध्या टन वजनाचा मी, माझी बॅग असे ओझे तो बिचारा सायकलस्वार वहात होता आणि रस्त्यावरच्या ओळखीच्या लोकांना “जय शंभू” म्हणत रस्ता कापत होता. आता तर फक्त सकाळचे ५ वाजले होते, आणि त्याला दिवसभर असेच लोकांना वाहायचे होते. पोटासाठी चाललेली त्याची धडपड पाहून मला त्याची कीव आली. कितीही झाले तरी, तो माझ्यामुळे शारीरीक दृष्ट्या थकत होता. त्यामुळे मी मनोमन असे ठरवले की वराणसीतच काय यापुढे कुठेही अशा तिचाकी वर बसायचे नाही. अस्सी घाट येथे उतरल्यावर तिथून जवळच असलेल्या हॉटेल ‘लेक व्ह्यू’ मध्ये माझी रूम बुक केली होती. हॉटेल मध्ये चेक इन करून मी रूम नंबर २०६ मध्ये गेलो. रूममध्ये dometry पद्धतीने शयनकक्षा होती. अतिशय माफक दरात हे होस्टेल मी बुक केले होते

आणि याबद्दल मी मलाच शाबासकी दिली. याचे कारण असे की, मी ज्या दिवसांत वाराणसीला आलो होतो, तो वर्षातला अतिशय गर्दीचा काळ असतो आणि या वेळेत माफक दरात हॉस्टेल भेटणे हा म्हणजे दुग्धशर्करा योग्य असतो. जवळपास दोन महीने आधी गाडीचे तिकीट बुकिंग आणि हॉटेल बुकिंग एकाच दिवशी केलं होतं. गावात अनेक हॉस्टेल आहेत पण त्या अरुंद गल्लीबोळात हॉस्टेल शोधायला खूप पंचाईत झाली असती. खरं म्हणजे माझी स्काऊट सर्फिंग करण्याची इच्छा होती पण अरुंद गल्लीबोळात जीव गुदमरला असता. माझ्या मते हा प्रकार सोलो बॅकपकर्स लोकांसाठी अतिशय उत्तम आहे. तिथल्या स्थानिक लोकांकडे पाहुणा म्हणून रहाणे आणि तिथले अस्सल जेवण करणे हा एक भन्नाट प्रकार असतो आणि मुख्य म्हणजे होस्टेल किंवा स्काऊट सर्फिंग हे दोन्ही प्रकार अतिशय स्वस्त असतात. त्यामुळे प्रवासाला पैसे लागतात ही सबब खोटी ठरते. शिवाय तिथल्या प्रॉपर लोकांसोबत राहिल्याने त्याठिकाणची संस्कृती, चालीरीती वगैरे अनुभवण्यास एक संधी प्राप्त होते. पुष्कर कुंडाजवळ माझे होस्टेल होते, अस्सी घाट पाच मिनिटांवर होता आणि लंका दहा मिनिटांवर होती. आशा मोक्याच्या ठिकाणी मला रूम भेटली होती.



खिडकीतून समोर बघितल्यावर पुष्कर कुंडाचे दर्शन होत होते. पण त्याच्यावर जलपर्णी सचल्याने पाणी मात्र दिसत नव्हते. मला शक्य तितक्या लवकर निघायचे होते, सुमारे साडे पाच वाजता मी आवरून बाहेर पडलो.




बाहेर पडताच मला एक स्पॅनिश जोडपे (?) भेटले, त्यांना ‘सुबह-ए-बनारस’ला जायचे होते. मी शेवटच्या दिवशी तिथे जाणार होतो त्यामुळे मी त्यांना दुरूनच रस्ता दाखवून मार्गाला लागलो. इथून पुढे मी पायीच फिरणार होतो. गोदौलीया चौकाच्या दिशेने मी निघालो. तेथून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर माझे गंतव्य ठिकाण होते, ‘बाबा कालभैरव मंदिर.’ जाताना वाटेत मला एका ठिकाणी गलका दिसला. मी कुतूहल म्हणून डोकावले तर स्टेट बँकेच्या ‘अस्सी घाट’ शाखेला आग लागली होती आणि धूर बाहेर येत होता. तिथे विचारपूस केली असता जीवितहानी वा

वित्तहानी झाली नव्हती. लोकं बाहेरूनच छायाचित्र काढण्यात दंग होते. तिथून मी पुढे निघालो आणि गुगल मॅप्सच्या भरवशावर तब्बल पाऊण तास पायपीट करून बाबा कालभैरव मंदिरात पोहोचलो. हे मंदिर वेगळं होतं. म्हणजे मला मूळ कालभैरव मंदिरात जायचं होतं. हे ते मांदिर नव्हतं. मी डोक्यावर हात मारून घेतला. माझा पाऊण तास वाया गेला होता आणि सोबत एनर्जीसुद्धा. मी सरळ रिक्षा केली आणि मंदिराकडे निघालो. सुमारे पाचशे मीटर अंतर दूर रिक्षा लावण्यात आली. बाबा कालभैरव मंदिरात जाताना पादत्राणे ठेवण्यासाठी सोय नाही, तेथील पूजा-साहित्य विक्री करणाऱ्यांकडे पादत्राणे ठेवावी लागतात. तसे न केल्यास ते उचलून डायरेक्ट कचराकुंडीत टाकली जातात. असे म्हटले जाते की,  श्री कालभैरव हे या महानगरीचे क्षेत्रपाल तथा कोतवाल आहेत, त्यांच्या इच्छेनुसार काशीत कुणीही राहू शकत नाही.  हे मंदिर इसवी सन १७१५ मध्ये श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी बांधले आहे. संपूर्ण बांधकाम दगडाचे आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करता येतो. सभामंडप हेमाडपंथी असून कोठेही बसले तरी मुखदर्शन होते अशी रचना आहे. श्री कालभैरवांची मूर्ती चांदीची असून सुमारे अर्धा पुरुष उंचीची आहे. चेहऱ्यावरील भाव बोलके असून मूर्ती हसतमुख आहे. हे कालभैरवांचे मूळ स्थान आहे. दुपारी २ ते ४ या वेळेत मंदिर बंद असते. (मागच्या वेळी नेमका याच वेळी

आलो होतो.) वेळ सकाळची असल्याने दर्शन लवकर झाले आणि मग थोडा वेळ सभामंडपात बसलो. “फोटो खिंचना मना है.” अशी सुचना कुठंही नाहीये, पण मोबाईल काढल्यावर तिथले लोकं जोरात ओरडतात. काही वेळ बसून मी पुढील स्थानाकडे जाण्यासाठी निघालो.

येथून जवळपास एक किलोमीटर अंतरावर ठठेरी बाजारात “द राम भांडार हे” नाश्त्यासाठी सुप्रसिद्ध असे दुकान आहे. तब्बल २०१ वर्ष जुने हे दुकान इसवी सन १८१८ मध्ये स्थापन झाले होते. परत एकदा अरुंद गल्लीबोळातुन वाट काढत मी चालू लागलो. या अरुंद गल्लीबोळातुन सकाळी फिरण्याची मजाच काही औरच असते. बनारसी लोकांची लगबग सुरू झालेली असते. लहनांची शाळेत जाण्यासाठी घाई सुरू असते तर कुणी दुकान लावण्याच्या तयारीत असतं. कुणी जानवं सावरत पुजेसाठी तयारी करून जात असते तर कोणी शांतपणे पान खात वर्तमानपत्र वाचत बसलेले असते. मध्येच गोमातांनी ठिय्या मांडलेला असतो. आजूबाजू असलेल्या खानावळींमधून तळण्याचा खमंग वास दरवळत असतो. जेमतेम दोन माणसे जातील इतक्या अरुंद वाटा असतात. या भाऊगर्दीतही दुचाकीस्वार भन्नाट वेगात गाड्या पळवत असतात. आशा परिस्थितीत चालताना रस्ता चुकवून त्रेधातिरपीट उडाली नाही तर नवलच.

ह्या अरुंद नागमोडी रस्त्यांवर मनाचा संयम ठेऊन ज्याने गाडी चालावली तो काय उद्या जगातल्या कुठल्याही रस्त्यावर गाडी चालवण्यासाठी सज्ज होईल. नुकतीच दिवाळी झाली असल्याने ठिकठिकाणी अर्धवट जळलेले फटाके दिसत होते. चौकात दिवाळीचे शुभेच्छाफलक नजर वेधून घेत होते. नागमोडी वळणं घेत द राम भांडार ला पोहोचलो. गरम-गरम जिलेबी नुकतीच तळण्यास सुरुवात झाली होती. कचोरी (आपल्याकडील पुरी) बटाट्याची भाजी , त्यावर अनेक चटण्या आणि जिलेबी हा वाराणसीचा जगप्रसिद्ध नाश्ता आहे. द राम भांडार हे खवय्यांना तसेच पर्यटकांना नेहमीपासूनच आकर्षित करत आले आहे. आपल्याकडे आपण ज्याला पुरी म्हणतो, तशीच पण थोडी उडदाची डाळ घालून तयार केलेली पुरी, याला ते गोल कचोरी म्हणतत आणि लाडूंसारख्या आकाराने लहान असणाऱ्या कचोरीला फक्त कचोरी म्हणतात. सकाळी देखील इथे बरीच मंडळी होती. शेवटी एका बाकावर जागा पकडून मी एक प्लेट कचोरी-भाजी आणि जिलेबीची ऑर्डर दिली. यथावकाश माझी ऑर्डर आली. बटाट्याच्या भाजीत टाकलेल्या विविध चटण्यांमुळे भाजीची चव अतिशय सुंदर होती आणि गरम जिलेबी तर अप्रतिम होती. ऐन सकाळी थंडीत

वाराणसीत असा नाश्ता करणे म्हणजे स्वर्गसुखापेक्षा कमी नाही. अहाहा...!!!, आता लिहितानासुद्धा तोंडाला पाणी सुटतंय. दुकानाचे मालक श्री राजेंद्रजी आपल्या दोन सहकाऱ्यांसह खवय्यांची भूक भागवण्याचे काम अव्याहतपणे करत आहेत. त्यांचे या उत्कृष्ट नाश्त्याबद्दल आभार मानायचे असं ठरवलं. मी त्यांना म्हटलो, "जी बोहोत स्वादिष्ट था सबकुछ."

त्यांनी हात जोडले आणि म्हणाले, "शुक्रिया, आपाको पसंद आया. हमको अच्छा लगा. धन्यवावाद." त्यांनी हसून निरोप दिला आणि मी पुढील मार्गाला लागलो.

आता मी श्री काशी विश्वनाथ मंदिरात जाणार होतो. परत गल्लीबोळातून जायचे होते. एका पानवाल्याला रस्ता विचारून निघालो. जवळपास पंधरा-वीस मिनिटं पायपीट करून मी श्री काशी विश्वनाथ मंदिराच्या गेट नंबर ३ जवळ आलो. मागच्या वेळी दोन नंबर गेटने गेलो होतो. तो रस्ता नदीकडून आहे.  आता गर्दी बरीच वाढली होती. सकाळी याच रस्त्यावरून गेलो तेव्हा चिटपाखरूही नव्हते, आणि आता गर्दीतून वाट काढावी लागत होती. याला कारणही तसेच होते, कार्तिक पौर्णिमेचा तथा देव दिपावलीचा कार्यक्रम काही दिवसांवर येऊन ठेपला होता. या दिवशी सर्वात जास्त गर्दी असते. तिथे जागोजागी पूजा साहित्य विक्रेते बसलेले

असतात. त्यांच्याकडे लॉकर सुविधा असते. आपण आपले मोबाईल वा तत्सम साहित्य सुमारे १०० रुपये देऊन त्यांच्याकडे ठेवायचे असते. अशी एकूण पध्दत इथे सुरू आहे. पण श्री काशी विश्वेश्वर ट्रस्टच्या माध्यमातून मोफत साहित्य देखील ठेवता येते. मी हा दुसरा पर्याय निवडला. रांगेत न लागता साडेतीनशे रुपयांत डायरेक्ट दर्शन घेण्याची सुविधा देखील आहे. मंदिरात जाण्याआधी पोलिसांनी तीन वेळा वेगवेगळ्या ठिकाणी कसून तपासणी केली. गेट नंबर तीन ने गेल्यास आपल्याला "ज्ञानवापी मशीद" नजरेस पडते. आधी येथेच मूळ श्री काशी विश्वेश्वराचे मंदिर होते. नंदी आजही मशिदीच्या दिशेने तोंड करून आहे. हे असे एकमेव मंदिर आहे जिथे नंदीचे तोंड उलट दिशेने आहे. ज्ञानवापी मशिदीच्या भोवती भक्कम लोखंडी गज उभारले असून आणि जागोजागी सशस्त्र सैनिक पहारा देत उभे आहेत. मुघल सम्राट औरंगजेब याने ०९ एप्रिल १६६९ ला मूळ काशी विश्वनाथ मंदिर नष्ट करण्याचे आदेश दिले. ज्याचा परिणाम म्हणून ऑगस्ट १६६९ ला मंदिर नष्ट करून ज्ञानवापी मशिदीची निर्मिती झाली. या आदेशाची मूळ प्रत कोलकाता येथील 'एशियाटिक लायब्ररी'त ठेवली आहे. हे स्थान शिवपार्वतीचे आदी स्थान आहे. महाभारत आणि उपनिषदांत याचा उल्लेख आढळतो. आग्र्याला जात असताना छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी येथे भेट दिली होती.

इसवीसन पूर्व अकराव्या शतकात सत्य बोलण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या राजा हरिश्चंद्राने मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. त्या नंतर अवंती नगरीचा तथा विक्रम शक सुरू करणारा चक्रवर्ती सम्राट विक्रमादित्य याने जीर्णोद्धार केला. तदनंतर सन ११९४ मध्ये मुहम्मद घोरीने मंदिर लुटून तोडले. मंदिराचे पुनर्निर्माण परत झाले पण १४४७ मध्ये सुलतान महमूद शाह याने मंदिर उध्वस्त केले. नंतर पुन्हा १५८५ मध्ये तोरडमल राजाच्या सहाय्याने पंडित नारायण भट्ट यांनी एका भव्य मंदिराची उभारणी केली. या मंदिराला १६३२ मध्ये शहाजहानने पाडण्याचे आदेश दिले पण त्याची सेना हिंदूंच्या प्रखर विरोधापुढे नमली, पण इतर ६३ मंदिरे तोडली गेली. यानंतर औरंगजेबने मंदिर तोडले व ज्ञानवापी मशीद उभारली. मंदिराच्या विध्वंसाचे वर्णन 'मशीद ए आलमगिरी' या पुस्तकात आहे. मराठा साम्राज्याचे शूर सरदार दत्ताजी शिंदे आणि मल्हारराव होळकर यांनी १७५२ ते १७८० या काळात मंदिर मुक्तीचे प्रयत्न केले. ७ ऑगस्ट १७७० ला महादजी शिंदे यांनी दिल्लीच्या बादशहाला करवसुलीचा आदेश दिला पण तोपर्यंत तिथे ईस्ट इंडिया कंपनीचे कायदे लागू झाले होते. त्यामुळे परत एकदा मंदिर नूतनीकरणाचे काम थांबले. सन १७७०-१७८० मध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

यांनी त्या परिसरात प्रस्तुत मंदीर बांधले. प्रस्तुत शिवलिंग हे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी स्थापन केले असून ते त्यांना ओंकारेश्वरच्या नर्मदेत एका दृष्टांतानुसार सापडले आहे.

तत्पूर्वी, सद्यस्थितीत आपण दर्शन घेत असलेल्या शिवलिंगचा इतिहास हा बाहुतेक जनतेला ज्ञात नाहीये. तो काहीसा असा आहे, औरंगजेब याने जेव्हा मंदिर लुटून रत्नखचित अशा लिंगाचा नाश केला तेव्हा काशीतले समस्त पंडित घोर चिंतेत पडले. तेव्हा श्री महादेवांनी त्यांच्या स्वप्नात जाऊन दृष्टांत दिला की, माझी या युगातली सर्वश्रेष्ठ भक्त (पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर), नर्मदेच्या तीरी ओंकारेश्वर जवळ वास करत आहे, तिला नर्मदेच्या पाण्यात जे लिंग सापडेल त्याची येथे स्थापना करावी.ते लिंगसुद्धा नष्ट झालेल्या लिंगास्वरूप मानून त्याची स्थापना आणि पूजा करावी करण नष्ट झालेल्या लिंगाचे अवशेष ज्ञानवापी मार्गे 'हाटकेश्वर'ला जाऊन मिळाले आणि त्यांचे आत्मतत्त्व नर्मदेतल्या लिंगात विलीन झाले आहेत. त्यामुळे शंकेला वाव नाही. असं म्हटलं जातं की श्री विश्वेश्वराचे मूळ लिंग हे नवग्रहांच्या रत्नांनी बनले होते. जर काशीत कुणी आजारी पडला तर त्याला या लिंगासमोर उभं केलं जाई, रत्नांच्या केवळ प्रकाशने तो व्यक्ति बरा होत असे. असो,

सुमारे पाऊण तास रांगेत उभे राहिल्यावर दर्शन झाले. गाभाऱ्यात जाताना तीनही रांगेतील भाविकांची मिळून एकच रांग होते. त्यामुळे थोडा गोंधळ होतो. दर्शन करण्यासाठी जेमतेम काही सेकंद मिळतात. त्यात शिवलिंगावर बिल्वपत्र आणि फुलांचा खच पडला नसेल तर आपलं नशीब चांगलं की शिवलिंग आपल्या दृष्टीला पडते आणि नकळतचं तोंडातून शब्द बाहेर पडतात,

"कैलास राणा शिवचंद्र मौळी ।

फणिंद्र माथा मुकुटी झळाळी ।।

कारुण्य सिंधू भवदु:खहारी ।

तुजवीण शंभो मज कोण तारी ।।"

अतिशय प्रसन्न अशा वातावरणातून बाहेर पडावेसे वाटत नव्हते. असंख्य चैतन्याच्या सागरात विलीन झाल्याचा अनुभव येत होता. सकारात्मक ऊर्जेचा अविरत वर्षाव होऊन आपण त्यात नखशिखांत चिंब

होतोय असं वाटत होतं. एक वेगळाच आणि अविस्मरणीय अनुभव, समस्त विश्वाला ऊर्जा प्रदान करणाऱ्या भंडारातून....

सभामंडपात थोडा वेळ बसलो. गर्दीचा ओघ सुरूच होता. मंदिराच्या आवारात पार्वती माता व अन्नपूर्णा मातेचे मंदिर आहे. भाविकांचा ओघ वाढत होता. माझ्या शेजारी एक परदेशी जोडपे पुजा करण्यासाठी बसले होते. गुरुजी आले आणि त्यांनी पुजा सुरू केली. आचमन वगैरे झाल्यावर गोत्राचा उल्लेख आला, तोच मी कान टवकारले कारण मला उत्सुकता होती की परदेशी लोकं गोत्राचे नाव कसे घेतील? पण गुरुजींनी ती स्टेप डायरेक्ट स्कीप केली आणि पुढे कंटीन्यू केले. परत एकदा मनोमन प्रार्थना करून मी बाहेर निघालो. सकाळी सव्वाअकरा ते साडेबारा पर्यंत आरती मुळे दर्शन बंद असते. नंतर दर्शन सुरू झाल्यावर खूप झुंबड उडते. मागच्या वेळी नेमका याच वेळी रांगेत अडकलो होतो. लॉकर मधून मोबाईल घेतला आणि शेजारीच मणिकर्णिका घाट लिहिलेल्या मोठ्या प्रवेशद्वारातून आत शिरलो.

मी आता विश्वनाथ गल्लीत होतो आणि मला ‘ब्लू लस्सी शॉप’, कचोरी गल्ली येथे जायचे होते. मंदिराच्या अवतीभवती विश्वनाथ गल्ली आहे. ह्या गल्लीत बनारसी साड्या, खादीचे कपडे, खेळणी तथा कंदी पेढ्यांची दुकाने आहेत. येथे नेहमीच वर्दळ असते. सलग कचोरीची दुकाने सुरू झाली तशी कचोरी गल्ली सुरू झाल्याचे मी ओळखले. येथिल बहुतांश दुकाने ही कचोरीची असल्यामुळे या गल्लीला ‘कचोरी गल्ली’ असे म्हटले जाते. तसेच इथे धार्मिक ग्रंथ, पौराणिक पुस्तकांची दुकाने भरपूर मोठ्या प्रमाणात आहेत. वाराणसीला गल्ल्यांचे शहर असे म्हणतात ते खोटे नाही, इथे तब्बल ५५ पेक्षा जास्त गल्ल्या आहेत. वाराणसीच्या गल्ल्यांबाबत असे म्हटले जाते की, जो रस्ता तुम्हला तुमच्या घरापर्यंत नेतो तोच तुम्हाला स्मशानाकडे सुद्धा नेतो. सकाळी नाश्ता झाल्यावर मंदिरात जात असतानाचा एक प्रसंग -

“जी, नमस्ते.”

“नमस्ते जी,”

“आप यहा कितने साल से रहते हैं?” मिस्किलपणे त्याने माझ्याकडे बघितले आणि म्हणाला,

“जी हमार जनम ही इधर हुआ है, लेकिन आप इ सब काहे पुछत हो हमसे?”

“जी मुझे जनाना हैं की आपको वरणसीकी सब गलीयां पता हैं क्या?”

“नाही जी ये तो नामुमकीन हैं भाई, इ सब भुलभुलैया हैं, सब शिवजी की क्रीपा हैं.”

“हां जी वो तो हैं, चलीये धन्यवाद.”

मला तो प्रसंग आठवला. अर्धचंद्राकृती गंगेच्या तीरी वसलेली वाराणसी ही खरचं मोठी भुलभुलैया आहे. वाराणसी हे जर मानवी शरीर मानले तर गल्ल्या म्हणजे रक्तवाहिन्या आहेत. वाराणसीत गल्ल्या आहेत की गल्ल्यांत वाराणसी हेच कळत नाही. झाले, मी वाराणसीच्या भुलभुलैयात फसलो. GPS सिग्नल लॉस्ट झाला आणि मी अक्षरशः भरकटलो. परत फिरून तिथेच आलो जिथून सुरुवात केली होती. परत कशीतरी वाट विचारत ब्ल्यू लस्सी शॉप ला पोहोचलो. या शॉपचा रंग निळा असल्यामुळे याला ब्ल्यू लस्सी शॉप नाव पडले. येथील लस्सी फार प्रसिद्ध आहे. आत काही गर्दी नव्हती म्हणून आतच बसणे पसंत केले. शॉपचे मालक निवांतपणे त्यांच्या वडिलांसोबत गप्पा मारत बसले होते. स्मितवादनाने त्यांनी मला मेन्यूकार्ड दिले.

मी एकंदर त्यावर नजर फिरवली आणि फ्लेवर्ड लस्सीपेक्षा साधी लस्सी ऑर्डर केली. कारण बनाना फक्त लस्सीमध्ये ते खरं केळं मिक्स करायचे. बाकी सर्व फ्लेवर्स वगैरे टाकून द्यायचे. शॉपच्या सर्व भिंतींवर पासपोर्ट फोटो चिकटवले होते. मी या कार्यक्रमासाठी माझा एक पासपोर्ट फोटो सोबत ठेवलाच होता. मी मालकाकडे गेलो, तसा तो म्हणाला,

"क्या हुआ सहब?"

"आपके पास ये फोटो स्टिक करने के लिये कुछ हैं?"

"हा, है ना. ये लिजीए."

आणि त्याने मला फोटो चिकटविण्यासाठी फेविकॉल दिला. मी यथासांग नीट जागा निवडून माझा फोटो चिकटवला आणि फेविकॉल त्याच्याकडे दिले.

"क्या आप मुझे बता सकते हैं की ये फोटो स्टिक कारनेकीं प्रथा कबसे शुरु हुई?"



“जी मैं भी ठिकसे नही बता सकता, लेकीन आप यहा आये थे इसकी याद में लोग फोटो लगाके जाते हैं.”

इतक्यात माझी लस्सी आली. लस्सीची चव अप्रतिम होती. एका भल्यामोठ्या मातीच्या भांड्यात (कुल्हड) मध्ये अगदी काठोकाठ भरून लस्सी माझ्या टेबलावर ठेवली. येथिल लस्सी बनवण्याची पद्धत देखील निराळी आहे. एका भांड्यात दही साखर यांचे मिश्रण एकजीव होईपर्यंत लाकडी रवीने घुसळतात. जवळपास सर्वच ठिकाणी अशी लस्सी बनवतात. मी पुण्यात असताना एका ठिकाणी पाटी वाचली होती की आमच्या येथील लस्सी प्यावी नाही तर खावी लागते. मला ही लस्सी खाताना ते दुकान आठवले. येथील लस्सी खरचं खावी लागत होती. (विनापाटीची!!!) मी येथे जाण्यासाठी शक्यतो सायंकाळ किंवा रात्रीची वेळ सुचवेन कारण, मणिकर्णिका घाट जवळच असल्याने थोड्या थोड्या वेळाने प्रेतयात्रा जात असतात. या अप्रतिम लस्सीसाठी मी आभार मानून बाहेर पडलो. ही लस्सी चाखल्यावर “पोट गार होणे” या वाक्याची प्रचिती आली. परत एकदा विश्वनाथ गल्लीतून दशाश्वमेध घाटाकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलो. याच

रस्त्याला भाजीबाजार भरतो. गर्दीतून वाट काढत सुमारे एक किलोमीटरवर हा घाट आहे. विश्वनाथ गल्लीतून मूळ रस्त्याला लागल्यावर दशाश्वमेध घाटाकडे जाण्यासाठी एक मोठी कमान लागते.

काशीमधील विश्वनाथ मंदिराशेजारी गंगा नदीच्या काठावर असलेला दशाश्वमेध घाट एक सर्वात जुना, नेत्रदीपक आणि महत्वाचा घाट आहे. इथे स्नान केल्यावर दहा दशाश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य मिळते अशी मान्यता आहे. त्यामुळे इथे स्नान करण्यासाठी भाविकांची गर्दी असते. इसवी सन १७४० मध्ये मध्ये श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी दशाश्वमेध घाटाची पुनर्बांधणी केली. नंतर १७७४ मध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी घाटाची पुनर्रचना केली. संध्याकाळी गंगेची आरती केली जाते तेव्हा या घाटाचे वास्तविक आकर्षण पाहून खूप आनंद होतो. (मागील वेळी आलो तेव्हा तत्कालीन पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी या ठिकाणी येणार असल्याने सुरक्षा कारणास्तव आम्हाला येथे जाऊ देणास मज्जाव करण्यात आला होता. असो,) सायंकाळी गंगा आरती सुरू असताना 'रिव्हरफ्रंट दृश्य' बघण्याची एक वेगळीच मजा असते. हा घाट वर्षानुवर्षे तसेच भाविक आणि पर्यटकांसाठी धार्मिक स्थळ बनला आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, हिंदू भाविकांमध्ये

हा सर्वात आवडता आणि मुख्य घाट मानला जातो. दशाश्वमेध घाटाजवळ अनेक धार्मिक मंदिरे तसेच पर्यटकांची स्थळे आहेत. विविध धार्मिक विधी आणि धार्मिक उपक्रम करण्यासाठी यात्रेकरू येथे येतात. हळूहळू घाटाच्या पायऱ्या उतरलो आणि तसतशे पवित्र गंगा नदीचे विशाल पात्र दिसू लागले. अथांग आणि प्रचंड गंगा. थोडा वेळ उभं राहूनच गंमत बघीतली. शेकडो भाविक गंगास्नानाचा आनंद घेऊन कृतकृत्य होत होते. कोणी सूर्याला अर्घ्यदान करीत होते, तर काही गंगेत डुबकी मारत होते. पट्टीचे पोहोणारे मात्र जरा लांबवर जाऊन पोहण्याचा आनंद घेत होते. त्यांच्या सोबत आलेले मात्र काळजीने त्यांच्याकडे बघत होते आणि जास्त लांब न जाण्याची सूचनावजा विनंती काळजीपोटी करत होते असे एकंदरीतच त्यांच्या देहबोलीवरून कळले. नावाडी लोकांची लगबग सुरु होती. थोड्या बाजूला जाऊन मी पायऱ्यांवर बसलो. अगदी प्रसन्न वातावरण होते. माझ्या बाजूला एक आयरिश व्यक्ती बसली होती, आणि या नयनरम्य वातावरणाचा आनंद न घेता मोबाईल मध्ये गुंतली होती. नंतर त्याने घरी व्हिडीओ कॉल करून घाट वगैरे दाखवले.

तत्पूर्वी, वाराणसीत आल्यावर नावेवर स्वार होऊन पवित्र गंगेची सैर करणं म्हणजे सोन्याहून पिवळं. Peak Hours असल्याने नाव लकर भारत होत्या. मी वेळ न दडवता नावेत बसलो. आमची नाव ‘वल्हव रे

नाखवा' टाईपची नव्हती, जनरेटर स्टार्ट असल्याने आमची फेरी लवकर पूर्ण होणार होती. आम्ही एकूण दहा जण होतो. नाव सुरू झाली आणि इतिहासाच्या आधीपासून इतिहास असलेले बनारस अजून एका वेगळ्या ॲंगलने दृष्टीला पडू लागले. महास्मशान दृष्टीला पडताच अंगावर काटा उभा राहिला. अविरत जळणारी प्रेतं..... जळणारी प्रेतं काही वेळापूर्वी जीवंत असतील. पण आता? आता त्यांच्या शरीराचं पूर्ण दहन होतंय की नाही हे पहाण्यासाठीसुद्धा कुणी नव्हतं.

कुठल्यातरी घाटावर शूटिंग सुरू होतं. तिथं थोडा वेळ नाव थांबवण्याचा आग्रह नावेतल्या काही मंडळींनी धरला. पण नावाड्याने ऐकले नाही. पायी घाट फिरणाची मजा वेगळी असते आणि नावेतून डोळ्यांत न मावणारे घाट बघण्याची मजा त्याहून वेगळी. बघताबघता अर्धा तास कसा गेला तेच कळलं नाही. आमच्या नावेतल्या बऱ्याच लोकांनी सर्व वेळ फोटो वगैरे काढण्यात घालवले. ते क्षण मनात साठवण्याऐवजी कॅमेऱ्यात टिपणं त्यांना चांगलं वाटलं. दशाश्वमेध घाटावर अजून पाच-दहा मिनिटं बसून मी पुढच्या घाटाकडे निघालो आज मी दशाश्वमेध घाट ते मणिकर्णिका घाट बघणार होतो. उद्या मणिकर्णिका घाट ते गणेश घाट आणि परवा दशाश्वमेध घाट ते अस्सी घाट.

असे एकंदरीत माझे नियोजन होते. पुढचा श्री राजेंद्र प्रसाद घाट होता. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती श्री राजेंद्र प्रसाद यांचे नाव या घाटाला १९८४ मध्ये पक्के बांधकाम झाल्यावर दिले. या आधी या घाटाचे नाव ‘घोडा घाट’ असे होते. मौर्य काळात या ठिकाणी घोड्यांचा मोठा बाजार भरत असे, त्यामुळे कदाचित हे नाव पडले असावे. नौका विहारासाठी येथे अतिशय मोठ्या प्रमाणात नौका उपलब्ध असतात. येथे विस्तीर्ण आणि लांब पायऱ्या आहेत. तसेच दोन भव्य जलशुद्धीकरणाचे टॅन्क आहेत. फोटोसेशन साठी हे अतिशय उत्तम ठिकाण आहे. लांब आणि विस्तीर्ण अशा पायऱ्यांवर सुमारे ५०-६० जणांचा ग्रुप हास्यविनोद करत होता. एक परदेशी पर्यटक त्या घोळक्याचे फोटो काढण्यात गुंतला होता. आम्हा सावळ्या भारतीयांमध्ये या गोऱ्याला असे काय दिसले की हा चक्क फोटो घेऊ लागला होता. सहज कुतूहल म्हणून मी त्याला पृच्छा केली असता तो म्हणाला,

“The joy on the faces of these people, which is diminishing these days (या लोकांच्या चेहऱ्यावरील आनंद, जो दिवसेंदिवस कमी होत आहे.)”

“Yes, you're right brother. But we can find the joy everywhere olny you need that spec who will show you happiness everywhere. (तुझे म्हणणे बरोबर आहे मित्रा, आपण आनंद कोठेही शोधू शकतो फक्त आपल्या तो चष्मा हवा जो आपल्याला सर्वदूर आनंद दाखवेल.)”

“Yes, I think you're partially right man. But sorry I want to go now before this group leave, Thanks (होय, तुझे म्हणणे काही अंशी बरोबर आहे, पण मला माफ कर हा ग्रुप इथून निघायच्या आधी मला जावे लागेल, धन्यवाद)”

“Ok, brother enjoy. (ठीक आहे भावा, मजा कर)”, असे म्हणून मी पुढे मोर्चा वळवला.

जवळच जंतर-मंतर आहे. सन १७३७ मध्ये जयपूरचे महाराज जयसिंग दुसरे यांच्या नेतृत्वाखाली याची निर्मिती झाली. भारतात उज्जैन, मथुरा, दिल्ली, वाराणसी आणि जयपूर या पाच ठिकाणी जंतरमंतर आहे.

पैकी मी उज्जैनचं जंतर-मंतर पहिलं असल्याने इथे गाईड वगैरेची मदत नाही लागली. सूर्यप्रकाशावरून स्थानिक वेळ, तसेच ग्रहांची स्थिती आणि इतर खगोलशास्त्रीय बाबींची सद्यस्थिती कोणत्याही उपकरणाशिवाय मिळते. हे ठिकाण म्हणजे भारतीय स्थापत्यकलेचा अप्रतिम नमुना आहे. हे बघून भारताविषयी ऊर अभिमानाने भरून येतो. जंतरमंतर बघण्यासाठी दहा रुपये नाममात्र शुल्क आहे.

इथून पुढे मी मान मंदिर घाटावर आलो. सोळाव्या शतकात जयपूरचे राजा मानसिंह यांनी या घाटाची बांधणी केली. यात त्यांनी घाट, मंदिर आणि महालाची निर्मिती केली. महाल हा राजपूत शैलीत बांधला असून भव्य आहे. आधी उल्लेख केलेल्या जंतरमंतरचे बांधकाम मानसिंहांच्या वंशजांनीच केले आहे. ऐतिहासिक दस्तावेजांनुसार या घाटाचे आधीचे नाव सोमेश्वर घाट असे होते. नंतर पुढे मीर घाटावरून सरळ ललिता घाटावर आलो. येथे श्री ललिता देवीचे मंदिर आहे. ललिता देवी म्हणजे हृदयची देवता अशी मान्यता आहे. हे मंदिर अतिशय पुरातन आहे. याच्या पुढेच काही अंतरावर नेपाळी मंदिर आहे. हे मंदिर नेपाळी शैलीत बांधले असल्याने याला नेपाळी मंदिर असे म्हटले जाते. संपूर्ण बांधकाम लाकडाचे असून त्यावर अप्रतिम शिल्पे कोरलेली आहेत. इथे एक मोठे शिवलिंग आहे. नंतर फिरून पुढे विश्वनाथ गल्लीतून दोन वेळा त्याच

जागेवर येऊन कसतरी मूळ रस्त्याला लागलो. दुपारचे दोन वाजले होते आणि मला एवढी विशेष भूक नव्हती. चव अजून जिभेवर रेंगाळत होती. श्री काशी विश्वनाथ मंदिरापासून गोदौलीया पर्यंत परत चालत जाण्याचे ठरवले. मी प्रवासात 'शक्यतो' पायी फिरणेच पसंत करतो. हळूहळू पायी फिरून आपल्याला ती जागा, लोकं चांगल्या प्रकारे समजतात. पण काही वेळा नाईलाज असतो.

चौकात पोहोचल्यावर मी अस्सी घाटापर्यंत शेअर-रिक्षा केली. तीन वाजेच्या सुमारास मी रूमवर पोहोचलो. समोरच्या बेडवरील सामानावरून कुणीतरी आले असल्याचे समजले. पहाटेचे जागरण आणि तब्बल आठ किलोमीटर पायी चालल्यामुळे मी कमालीचा थकलो होतो. आणि वेळ न दडवता मी पलंगावर आडवा झालो. जाग आली तेव्हा सायंकाळचे सहा वाजले होते. बाहेर बघितले तर चक्क काळोख पडला होता. या दिवसांत साडेपाच वाजताच काळोख पडतो. रात्री लागणारे आवश्यक समान आणि 'सोलो टेंट' घेऊन मी रूमबाहेर पडलो.

इथे एक बॅनर दिसले. – “श्री भागवत सप्ताह, आयोजक- श्री गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर, नाशिक, महाराष्ट्र.”

माझं कुतूहल जागं झालं. मी तिथं गेलो, तिथं सुमारे पाच हजार लोकांचा जनसागर श्री भागवत ग्रंथाचे पारायण करत होता. या लोकांच्या जेवणासाठी तिथंच किचन होतं. त्यांना विचारल्यावर अशी माहिती मिळाली की, भारतावरील तथा जगावरील सर्व मानवनिर्मित, नैसर्गिक संकटांचा समूळ नाश व्हावा असा ‘वैश्विक महासंकल्प’ करून या अनुष्ठानाची सुरुवात झाली होती. मी मराठी आहे कळल्यावर त्यांनी जेवणाचा भरपूर आग्रह केला पण आधीच भरपूर वेळ झाला असल्याने मी त्यांचे आभार मानून निघालो. मला त्या सेवेकऱ्यांचे खूप आश्चर्य वाटले. घरापासून हजारो किलोमीटर दूर येऊन देशासाठी आध्यात्मिक अनुष्ठान करणे म्हणजे एक दिव्यच होतं आणि हे फक्त मराठी माणूसच करू शकतो हे “याची देही याची डोळा” अनुभवलं. मी अस्सी घाटाला वळसा घालून लंकेकडे वळलो.

पुष्कर कुंडापासून लंकेपर्यंतचे सुमारे दीड किलोमीटर अंतर पायीच जाण्याचे ठरवले. शहराचा हा भाग नेहमीच गजबजलेला असतो. बनारस हिंदू विद्यापीठाच्या या परिसरास लंका असे म्हणतात. विद्यार्थी वर्गाची येथे नेहमीच वर्दळ असते. सुटसुटीत आणि प्रशस्त रस्ते, आजूबाजूला पुस्तकांची दुकाने आणि हॉटेल्स असा

हा भाग बघून आपण सकाळी फिरलो तो याच शहराचा भाग आहे की आपण कुणी दुसरीकडे आलो आहे असे वाटते. ही मॉडर्न वाराणसी आहे. या महानगरीचं हेच तर वैशिष्ट्य आहे. म्हटलं तर इतिहासाच्या आधी आणि म्हटलं तर नित्यनूतन!!! लंकेपासून पाच किलोमीटर अंतरावर गडवाघाट आश्रम आहे. आजची रात्र मी तिथे टेंट टाकून रहाणार होतो. ‘तनिष डायनींग हॉल’ येथे मी रात्रीचे जेवण घेणार होतो. हॉटेलमध्ये जास्त गर्दी नव्हती, एक थाळी ऑर्डर केली. जेवणासाठीची ठिकाणं मी आधीच ठरवून घेतली होती. वाराणसीत बाटी-चोखा हा प्रकार जास्त प्रसिद्ध आहे. पण मी मुळचा खान्देशी असल्यामुळे वरण-बट्टी आमच्यासाठी विशेष नाही. बाटी-चोखा, शिवाय, तनिष यांसारखे हॉटेल त्यांच्या थळयांसाठी प्रसिद्ध आहेत. मी सकाळपासून फक्त पुरीभाजी आणि लस्सीवर असल्याने मला प्रचंड प्रमाणात भुक लागली होती. मी व्हेज डिलक्स थाळी ऑर्डर केली होती. जवळजवळ दहा मिनिटं वाट बघितल्यावर माझी थाळी आली. व्हेज डिलक्स थाळीत पनीर, मिक्स व्हेज, रायते, जिरा राईस, डाळ,तंदुरी रोटी आणि गुलाबजाम हे पदार्थ होते. पनीर म्हणावं तसं तिखट नव्हतं, पण भरपूर ग्रेव्ही होती. त्यामानाने मिक्स व्हेज चांगली होती. गुलाबजाम मेडियम साईझचे होते. मला ते बनारस स्पेशल जायंट गुलाबजाम खायचे होते. माझी अपेक्षा होती की इथं ते

असतील, पण माझा भ्रमनिरास झाला. हॉटेलमधले वातावरणसुद्धा छान होते. त्यामुळे माझं डिनर किमतीला न्याय देणारं झालं.

लंका चौकातली ती एक रम्य सायंकाळ होती. दिव्यांच्या झगमगटामुळे चौकला अजून शोभा आली होती. थंड वारे वाहत होते. बराच वेळ वाट बघितल्यावर शेअर रिक्षा न मिळाल्याने गडवा घाट आश्रम पर्यंत मी स्पेशल रिक्षा केली. रात्री शक्यतो इकडे कुणी नसतं. कारण गडवा घाट हा जवळपास शेवटचा घाट आहे. मला संतमत अनुयायी आश्रम येथे जायचे होते.  मुख्य दरवाजातुन आत गेल्यावर मला तेथे बरेच अनुयायी भेटले. मी त्यांना मला इथे आजची रात्र राहू देण्याची विनंती केली. त्यांनी लगेच मान्य केले, कारण तिथे भरपूर रूम्स होत्या. विशेष म्हणजे नाममात्र शुल्क होते.

पण मी जेव्हा त्यांना सांगितले की, मला रूममध्ये रहायचे नसून मोकळया जागेत टेंट टाकून रहावे लागेल तेव्हा मात्र त्यांनी असमर्थता दर्शविली. मी त्यांना परत विनंती केली तेव्हा त्यांनी विशेष परवानगी घ्यावी लागेल असे सांगितले. त्यांच्यापैकी एक जण स्वतःहून परवानगी घ्यायला मध्ये गेला. तो पर्यंत अनुयायी आणि माझ्यात काही असा संवाद झाला. -

“आप कबसे हैं यहांपर?” मी थोडे भीतच विचारले.

“हमार तो जनम ही वाराणसी मे हुआ. कुछ दस साल के थे तबसे इधर हैं.” हे सांगताना त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळाच अभिमान दिसत होता. कदाचित त्याला असे कोणी विचारले नसावे.

“तो फिर आप क्या करते हैं दिनभर?” मी काहीतरी विचारायचं म्हणून विचारलं कारण माझी कॅम्पिंगची इच्छा काही पूर्ण होईल असे एकूणच वाटत होते.

“हम तो गोशाला में रहते हैं, दिन कब निकलता हैं पता ही नही चलता.”

“और कुछ सुनाइये?” मी उत्सुकता म्हणून विचारले.

“जी आपने पुछा इसलीये बता रहे हैं. आप यहा आये ये शिवजी की मर्झी हैं, क्योंकी लगभग दो साल पहले शायद इसी दिन यहा विश्वशांती के लिये अतिरुद्र की पूजा हुई और आज जो आप ये सब शांती इस देश मे देख रहे हैं, वो इसिका परीणाम हैं.”

त्याचे बोलणे पूर्ण होते न होते तोच परवानगी घ्यायला गेलेली व्यक्ती परत आली, त्याने सांगितले की तुम्हाला परवानगी भेटली आहे पण सकाळी सात वाजेच्या आत निघावं लागेल. मी त्यांच्या सगळ्या सुचना मान्य करून मी लगेच टेंट टाकला. कितीतरी दिवसांत म्हणजे जवळपास वर्षभरापूर्वी मी भीमाशंकरला कॅम्पिंग केलें होते. त्यानंतर तब्बल एका वर्षाने ही संधी चालून आली होती. दोघी ठिकाणं ज्योतिर्लिंग होती हा निव्वळ योगायोग होता. या सर्वांत एक वाईट गोष्ट घडली होती ती म्हणजे मोबाईल मध्ये अजिबात चार्जिंग नव्हती. दुपारी वामकुक्षीच्या वेळी मी मोबाईल चार्जिंग लावायला विसरलो होतो. आडवं होताच मला दिवसभरच्या श्रमाने आणि रात्रीच्या अप्रतिम जेवणाने तात्काळ झोप लागली. पहाटेच्या सुमारास जाग आली तेव्हा टेंटच्या छतावर पाण्याचे थेंब पडल्यासारखे वाटत होते, मी बाहेर डोकावून पाहिले तर पाऊस वगैरे काही पडत नव्हता. जमीनीवरील गवतावर हात फिरवला तर हात अक्षरशः ओला झाला. इतक्या मोठ्या प्रमाणात दव पडलं होतं. सर्वत्र अंधार होता, त्यामुळे बाहेर पडून काही उपयोग नव्हता, झोपण्याचा प्रयत्न केला पण झोप काही येत नव्हती. काही वेळाने काहीतरी आवाज येऊ लागला, मी टेंटमधून बाहेर पडलो. काही अंतरावर ज्वारीचे शेत होते, तिथे काही लोकं ज्वारीचे धांडे कापत होते. मी त्यांना पृच्छा केली असता

ते धांडे चारा म्हणून गायींसाठी कापले जात होते. इतक्यात मला कोणत्यातरी पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू आला. असा आवाज आधी ऐकला नव्हता, तो नेमका आवाज कशाचा हे बघण्यासाठी म्हणून मी गेलो तर समोरील दृश्याने मला आत्यंतिक आनंद झाला. समोर काही अंतरावर १५-२० मोरांचा घोळका मुक्तपणे केकाटत फिरत होता. इतके मोर मी आयुष्यात पहिल्यांदाच पाहिले होते. खरंच अशा प्रकारच्या दिवसाची सुरुवात म्हणजे स्वर्गसुख असते. ते इतका आक्रोश करत इकडे तिकडे पळत होते की नेमका कोणता मोर आणि कोणता क्षण मनात साठवू असं झालं होतं. बाजूलाच विविध प्रकारच्या फळभाज्या पालेभाज्या खुडण्याचे काम चालू होते. मंडळी सकाळीच कामाला लागली होती. मी जवळपास अर्धा तास तिथं फिरत होतो. ते मोर माणसाळलेले होते बहुतेक. कारण ज्या ठिकाणी गाजर लावले होते तिथे ते बिनधास्तपणे पिंगा घालत होते. साडेसहा झाले होते मी टेंट वगैरे आवरून बाहेर पडलो आणि मार्गाला लागलो.

हाकेच्या अंतरावर गंगा वहात होती. त्यामुळे वातावरणात गारवा जास्त वाटत होता. नुकत्याच साखर झोपेतून उठलेल्या आणि आपल्याला तयार होऊन शाळेत जाण्यावाचून गत्यंतर नाही अशी हळूहळू मनाची तयारी करणाऱ्या लहान मुलासारखी वाराणसी दिवसभरासाठी तयार होत होती. साडेसात वाजेपर्यंत मी रूमवर

पोहोचलो. शांतपणे तयारी करून सव्वा आठच्या सुमारास बाहेर पडलो. परत एकदा नाश्ता करायला राम भंडार ला आलो आणि कालच्या दिवसाची उजळणी केली. जी चव काल होती त्या चवीत आज यत्किंचितही फरक पडला नव्हता. परत एकदा राजेंद्रजींचे आभार मानले.



आज मणिकर्णिका घाट ते गणपती घाट पहायचे होते. राम भांडार ते मणिकर्णिका घाट या रस्त्यात जवळपास तीन ते चार वेळा भरकटुन त्याच जागेवर आलो. शेवटी एका ठिकाणी शांतपणे गुगल मॅप्स आणि बनारसी लोकांवर विश्वास ठेऊन एकाच दिशेने वाटचाल सुरू केली. एका गल्लीतून जाताना मला भलामोठा लाकडांचा ढिग दिसला. मी त्या घरापाशी गेलो तोच एक अरुंद गल्लीत लाकडे मोजण्याचे काम सुरू होते. मी त्याच गल्लीतून जात राहिलो आणि शेवटी घाटाजवळ येऊन पोहोचलो. तोच मणिकर्णिका घाट होता. शक्यतो तिथे पर्यटकांना जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. तरीही आपण दुरून बघू शकतो. समोरचे दृश्य अंगावर काटा आणणारे होते. अनेक चिता अविरतपणे जळत होत्या, आणि जळणाऱ्या प्रेतांनंतर अनेक प्रेतं अक्षरशः जळण्यासाठी प्रतीक्षेत होती. माझ्यासमोर जे होते तेच जीवनाचे खरे अंतिम सत्य होते – "मृत्यू."

कितीतरी वेळ मी त्या दृष्याकडे बघत होतो. असे म्हणतात की येथे दहन केल्यावर मोक्षाची प्राप्ती होते, त्यामुळेच कदाचित येथे दहन करून घेण्याचा ओढा असावा. इसवीसन १७३० मध्ये सदाशिव नाईक यांनी श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या मदतीने या घाटाचे पक्के बांधकाम केले. येथे बरीचशी जुनी मंदिरे असून त्यातील अर्धीअधिक श्री शिवाला समर्पित आहेत. त्यांचे निर्माण बंगाल, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश,

राजस्थान, बिहार तसेच गुजरात मधील वेगवेगळ्या राजवटींच्या काळात झाले आहे. धार्मिक तसेच सांस्कृतिक दृष्टीने हा घाट अतिशय महत्वपूर्ण आहे. सुमारे अठराव्या शतकाच्च्या सुरुवातीला येथे शव दहनाची प्रथा सुरू झाल्यापासून हा घाट तीर्थ तसेच स्मशान म्हणून प्रसिद्ध आहे. स्मशानभूमीच्या काही अंतरावर स्नान करण्यासाठी जागा आहे. कार्तिक महिना, सूर्य - चन्द्र ग्रहण, एकादशी, संक्रांत, गंगा दशहरा या दिवशी स्नानासाठी खूप गर्दी असते. पिंडदान, तर्पण असे विधी देखील येथे होत असल्याने बऱ्याच प्रमाणात न्हावी लोकं आहेत. ही जागा तंत्र साधनेसाठी अतिशय प्रभावशाली मानली जाते. त्यामुळे देशविदेशातील तांत्रिक येथे साधनेसाठी येतात. येथे अघोरी साधूंचे देखील मोठ्या प्रमाणात वास्तव्य असते. मणिकर्णिका घाटानंतर मी पुढच्या घाटाकडे वळलो. सिंधीया घाटाकडे जात असताना एका ठिकाणी गंगेचे अप्रतिम सौंदर्य न्याहाळायला थांबलो. पाच मिनिटांनंतर पायऱ्यांवरुन जात असताना नदीकडेच लक्ष होते. समोर बघितलं तर एक आकृती दिसली आणि तिने अचानक डोळे उघडले, मी दचकलोच अचानक. तो एक नागा साधू होता. सर्वांगाला भस्मलेपन करून शांतपणे पद्मासनात बसला होता. आधी मी त्याला पाहून

घाबरलोच होतो. कारण वाढलेल्या जटा, भस्माने माखलेले पांढरे शरीर असं अचानक बघितल्यावर कुणाची त्रेधातिरपीट उडणार नाही.

पुढचा घाट होता सिंधिया घाट किंवा शिंदे घाट. इसवीसन १८३५ मध्ये ग्वाल्हेरच्या राणी बायजाबाई शिंदे यांनी या घाटाची पक्की बांधणी केली. त्यानंतर याला सिंधिया किंवा शिंदे घाट असे म्हटले जाऊ लागले. तत्पूर्वी सन १३०२ मध्ये विरेश्वर नावाच्या कुणी व्यक्तीने हा घाट बांधला असल्याने विरेश्वर घाट म्हणून ओळखला जायचा. अशी मान्यता आहे की या जागेवर अग्नी देवतेचा जन्म झाला. सर्वांत सुंदर आणि स्वच्छ घाटांपैकी हा एक आहे. त्यामुळे येथे योगासन तथा ध्यानधारणेसाठी बरीच गर्दी असते. शकतो परदेशी पर्यटक योगाभ्यास करण्यासाठी येथेच असतात. त्याचप्रमाणे हा घाट रत्नेश्वर महादेव मंदिरासाठी प्रसिद्ध आहे.

या मंदिराची खासियत म्हणजे हे मंदिर अर्धेअधिक पाण्यात बुडालेले असते. वर्षाचे सुमारे आठ महिने मंदिराचे गर्भगृह पाण्यात असते. उन्हाळ्यात चार महिने पाणी ओसरल्यावर जाता येते. मंदिर एका बाजूला झुकलेले असल्याची चार कारणे किंवा दंतकथा सांगितल्या जातात. तसेच मंदिर कुणी बनविले यावरून देखील बऱ्याच आख्यायिका आहेत. रत्नेशवर महादेवचे मंदिर हे ‘नऊ’ अंशात झुकले आहे किंवा तशा पद्धतीने बांधले गेलेले आहे. त्यामुळे ‘चार’ अंशात झुकलेला पीसाचा मनोरा बघण्याआधी किंवा त्याचं कौतुक करण्याआधी लोकांनी हे मांदिर आवर्जून बघावं. हे मंदिर दुरूनच बघीतलं. कारण अर्धेअधिक मंदिर पाण्यात होते. नंतर मी पुढच्या गंगा महाल घाटाकडे वळलो. या घाटाचे निर्माण सन १८६४ मध्ये जिवाजी राव शिंदे यांनी केले. या घाटाबरोबर त्यांनी एका भव्य महालाची देखील निर्मिती केली. हा महाल म्हणजे राजस्थानी तसेच स्थानिक स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे. शक्यतो येथे स्नान करण्यासाठी स्थानिक लोकांचा कल असतो. याचे कारण म्हणजे इथे जास्त पर्यटक नसतात, त्यामुळे शांतता असते.

हा घाट बघून मी संकठा घाटाकडे आलो. या घाटाचे पक्के बांधकाम १८२५ मध्ये झाले. येथे नवदुर्गांपैकी एक श्री कात्यायनी तथा संकठा देवीचे मंदिर आहे त्यामुळे या घाटाचे नाव पडले आहे. पुढे भोसले घाट लागला. १७९५ मध्ये नागपूरकर भोसल्यांनी याची निर्मिती केली. या आधी या घाटाचे नाव नागेश्वर घाट असे होते. घाटावर बांधलेला महाल हा अतिशय भव्य असून नागपूरकर भोसल्यांच्या श्रीमंतीची साक्ष आजही देत आहे.

पुढे मी गणेश घाट इथं आलो. खरं म्हणजे माझी हा घाट बघण्याची आधीपासूनच फार इच्छा होती. सन १८०७ मध्ये अमृतराव पेशव्यांनी याची निर्मिती केली. येथे श्री गणपतीचे अमृत विनायक गणेश मंदिर आहे. प्रस्तुत मंदिर हे नागर शैलीत बांधले असून श्री गणेशाची विलोभनीय मूर्ती आहे. तिथे फोटो काढायला सक्त मनाई केली आहे, तरी मी लपूनछपून फोटो काढलाच. पेशव्यांच्या वापरातील काही वस्तू आणि त्यांच्या वंशजांच्या तसबिरी पहायला मिळतात. तत्पूर्वी, फोटो काढताना मला वरच्या मजल्यावरून कुणीतरी

बघितलं आणि ती व्यक्ती माझ्यावर ओरडली तेव्हा मी पटकन मोबाइल खिशात ठेवला आणि लगेच निघालो.

मंदिरातून बाहेर पडल्यावर मी परत एकदा वाट चुकण्यासाठी गल्ल्यांत शिरलो आणि वाट दोन-तीन वेळा चुकलो देखील. मजल-दरमजल करत विश्वनाथ गल्लीतून मूळ रस्त्याला लागलो. त्या दिवशी एकादशी होती (कार्तिकी एकादशी), त्यामुळे असंख्य भाविक विश्वनाथ दर्शनाला आले होते. समोरच मला 'मलाइयो' वाला दिसला आणि पावले तिकडे वळली. हा पदार्थ दुधापासून बनविला जातो आणि सबंध वाराणसीत फक्त हिवाळ्यात मिळतो. हा पदार्थ डोळ्यासाठी चांगला असतो असं म्हणतात. मातीच्या कुल्हड मध्ये मलाइयो आणि ते झाल्यावर गरम दूध असा हा प्रकार असतो. आता पुढे मला लंकेला जायचे होते. डायरेक्ट रिक्षा मिळणार नव्हती म्हणून गोदौलीया चौकापर्यंत चालणं पसंत केलं. यथावकाश चौकातून मला रिक्षा मिळाली आणि मी लंका गाठली. मी घाईत असल्याने लगेच रिक्षात बसलो, तर रिक्षा चालक हा एक

साधारणतः सोळा वर्षांचा मुलगा होता. त्याला लगेच पोलिसांनी अडवलं आणि त्यांच्यात बरीच बाचाबाची झाली. शेवटी पोलिसाने त्याला सोडलं आणि आम्ही निघालो.

लंकेला पोहोचल्यावर समोरच असलेल्या पहिलवान लस्सी मध्ये गेलो आणि एक रबडी-लस्सी मागवली. पहिलवान लस्सी हेदेखील लस्सीसाठी प्रसिद्ध आहे. रबडी आणि लस्सी यांचे मिश्रण खरंच खूप छान होते.

समोरच बनारस हिंदू विद्यापीठाचे गेट होते. पण मला माझ्या नियोजनानुसार तिकडे उद्या जायचे होते. त्यामुळे मी तिथून वळालो आणि दुर्गाकुंड कडे निघालो. दुर्गकुंडच्या बाजूलाच दुर्गा मंदिर आहे. प्रस्तुत मंदिर वाराणसीतल्या महत्वाच्या मंदिरांपैकी एक आहे. हे मंदिर बंगालच्या राणी भवानी यांनी बांधले आहे. भडक लाल रंगात हे मंदिर असून १७६० साली बांधले गेले आहे. त्या काळी या मंदिरासाठी पन्नास हजार रुपये खर्च आला होता.



मंदिराच्या सभमंडपाचे तथा आजूबाजूच्या परिसराचे काम दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी केलेले आहे. मंदीरातील घंटा श्री नेपाळ नरेश यांनी अर्पण केली आहे. मंदिरात प्रवेशासाठी दोन प्रवेशद्वार आहेत. मंदिराची रचना नागर शैलीत आहे. मंदिराच्या बाजूला असलेले कुंड हे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधले आहे. मंदिर परिसर अतिशय उत्तम असून भरपूर स्वच्छता आहे. मंदिर परिसरात श्री सुक्ताचे हवन चालले होते. धगधगत्या यज्ञकुंडात आहुती पडत होती आणि धुराच्या स्वरूपाने निसर्गदेवतेला अर्पण होत होती.

नंतर मी पुढे कवडीमाता मंदिर पाहिले. येथे शक्यतो महाराष्ट्रातील लोकं येत असतात. मंदिर अतिशय लहान आहे. कवडीमाता ही शंकराची बहीण म्हणून ओळखली जाते. इथे देवीला पांढऱ्या कवड्या अर्पण करण्याची प्रथा आहे. तिथून पुढे मी सत्यनारायण तुलसी मानस मंदिरात आलो. याचे उद्घाटन श्री सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी केले आहे. मंदिर अतिशय भव्य असून आजूबाजूला उद्यान फुलवले आहे. मंदिराच्या सर्व भिंतींवर रामायण आणि इतर शास्त्र वचनं कोरली आहेत. वरच्या मजल्यावर रामायण आणि महाभारतातले प्रसंग हलत्या देखाव्याच्या स्वरुपात पर्यटकांसाठी म्हणून उपलब्ध आहेत. इथं पाच रुपये नाममात्र फी आहे. पण सर्व प्रसंग इतक्या सुंदरपणे दाखवले आहेत की पाहावंच वाटतं. सर्व देखाव्यांच्या

प्रसंगातल्या मूर्त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, विविध रंगांच्या लाईट्सचा वापर हे इतके हटके आहे की, त्यात जीवंतपणा आला आहे.



दुपारचे चार वाजत आले होते आणि माझी “काशी चाट भंडार” ला जाण्याची वेळ झाली होती. काशी चाट भंडार हे आपल्या चाट प्रकारच्या पदार्थांसाठी प्रसिध्द आहे. अशा पदार्थांसाठी प्रसिद्ध अजून एक बिना चाट भंडार म्हणून आहे. पण ते कालभैरव मंदिर परिसरात आहे, त्यामुळे तिकडे जाण्यासाठी बराच वेळ वाया गेला असता. काशी चाट भंडारला गेल्यावर सुमारे पंधरा मिनिटं माझा नंबरच लागला नाही. त्यामुळे चेन्नईच्या घटनेची पुनरावृत्ती होते की काय असे वाटू लागले. (सुमारे अर्धा तास वाट बघूनही मुरुगन इडली शॉप ला नंबर लागला नव्हता.) शेवटी एकदाची जागा



भेटली. येथील टमाटर चाट प्रसिद्ध आहे. मी टमाटर चाट, आलू चाट आणि गुलाबजाम अशी ऑर्डर दिली. माझ्यासमोर दोन परदेशी पर्यटक दही पुरी खात होते. ती अतिशय तिखट असल्याने अर्धवट सोडून चालले गेले. त्यांच्या डोळ्यांतून अक्षरशः पाणी येत होते. त्यांना सवय नसेल बहुतेक. बऱ्याच वेळाने माझी ऑर्डर आली आणि मोहोरीच्या तेलात बनलेल्या चाटचा आस्वाद घेतला. दोघी चाटची चव अप्रतिम होती. विशेष म्हणजे हे पदार्थ तयार करण्यासाठी मोहोरीचं तेल वापरतात, त्यमुळे एक वेगळीच चव आणि सुगंध प्राप्त होते गरम असल्याने ते थोडे तिखट वाटत होते, पण सर्व चविंचे एक अप्रतिम मिश्रण होते ते. नंतर गुलाबजाम कडे वळलो. त्या गुलाबजामचा आकार लाडूंएवढा होता. मी इतके मोठे गुलाबजाम पहिल्यांदा बघत - खात होतो. ते माझ्यासमोरच तळले आणि पाकातून काढले गेले असल्याने खूप गरम होते. त्या प्रचंड मोठ्या

गुलबजाम्सला खायला चमचा दिला होता. चमच्याने गुलाबजाम फोडून खाण्यात एक वेगळीच मजा होती. त्यांची चव देखील अप्रतिम होती. इथून पुढे मी रूमवर गेलो. लगेच अर्ध्या तासाने मला बाहेर पडायचे होते.

पावणेसहाच्या आसपास मी बाहेर पडलो आणि पाच मिनिटांवर असलेल्या अस्सी घाटावर आलो. काळोख पडत होता आणि सर्वदूर विद्युत रोषणाईने परिसर झगमगत होता. अस्सी घाटाला यात्रेचे स्वरूप आले होते. सुबह ए बनारसच्या व्यासपिठावर शास्त्रीय नृत्याचा कार्यक्रम सुरू होता. तिथं बरीच गर्दी जमली होती. घाटावर होणाऱ्या गंगा आरतीची तयारी सुरू होत होती. मी पटकन अगदी पहिल्याच बाकावर ठाण मांडले. समोर संथ पण अथांग असलेली गंगा वहात होती. सोबत असंख्य जलबिंदू होते. काही हिमालयापासून सोबत होते, काही वारणेतुन सोबती झाले होते, तर काही आकाशातून ‘पाऊस’ असे नाव धारण करून आले होते. पुढे प्रयागराजला अजून मिळणार होते. पण सर्वांचे गंतव्य ठिकाण एकच होते समुद्र ! परत तिथून बाष्पीभवन नाव घेऊन नभाच्या मदतीने भूमीवर येणार होते. असे त्या जलबिंदूंचे जीवनचक्र होते. माणसांचे कुठे वेगळे असते. असो,

हळूहळू गर्दी जमा होत होती. परदेशी पाहुणे देखील उत्सुकतेने कॅमेरे घेऊन येत होते. साडेसहा झाले आणि एकसारख्या पोशाखात पाच तरुण आरती करण्यासाठी म्हणून आले. पिवळं पितांबर आणि मरूण रंगाचा कुर्ता घातलेले ते पाचजण आपापल्या जागेवर स्थानापन्न झाले. धुपाचा सुगंध सर्वदूर दरवळत होता. घंटानादाने वातावरणात अतिशय सात्विकता येत होती. पुरोहितांचे मंत्रोच्चारण, सुमधुर संगीत याने भारावून जायला होत होते आणि आपसूकच तोंडातून शब्द बाहेर पडतात – “नमामी गंगे...!!!”

प्रथमतः शंखनादाने सुरुवात झाली. एका विशिष्ट सुरात शंखनाद ऐकत असताना कान तृप्त होत होते. नंतर त्वमेव माता, गुरुरब्रम्हा, शिवध्यान, पार्वती ध्यान, गंगा ध्यान, सर्वे भवन्तु सुखीन आदि श्लोकांचे पठन सुरू असताना आरती करत असणारा पूरोहितवर्ग गेंगेकडे तोंड करून अगरबत्ती एका वेगळ्याच लयीत ओवाळत होता. त्यांच्या दुसऱ्या हातात घंटा होती, त्यांची ती घंटानाद करण्याची  विशिष्ट पद्धती मन मोहून टाकणारी होती. शेवटचा श्लोक सुरू असताना सर्वजण उजव्या बाजूने नव्वद अंशात वळले आणि परत ओवाळू लागले, मग परत नव्वद अंशात आणि परत एकदा. थोडक्यात काय तर त्यांनी एक स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण केली. नंतर त्यांनी धूप ओवाळायला सुरुवात केली. परत त्याच विशिष्ट लयीत, धूपाच्या

धुरामुळे सात्विक ढग तयार होत होते आणि एका वेगळ्याच आनंदाचा वर्षाव करत होते. शेवटचा श्लोक झाला आणि पुरोहितांनी हातातले धूप खाली ठेऊन प्रचंड मोठ्या आरत्या हातात घेतल्या. त्या एक विशिष्ट प्रकारच्या आरत्या होत्या. सुमारे एकशे आठ वाती असाव्यात बहुतेक. थोडक्यात त्या मला दीपमाळ भासल्या आणि कानावर शब्द पडले, "जय गंगे माता, मैया जय गंगे माता" आणि आरती सुरू झाली. आरतीचे बोल, सुर, ताल आणि सोबतचं धुंद करणारं सात्विक संगीत इतके अप्रतिम होते की हे कधीच संपू नये असं वाटत होतं. सोबत एकाच विशिष्ट ढंगात आरती ओवाळणारे पूरोहित बघून असं वाटतं की, बस्स. आता काही नको आयुष्यात. हे बघूनच डोळ्यांचे पारणे फिटले. सुमारधूर स्वरात गंगा आरती ऐकताना हरवून जायला होतं. आरती संपल्यावर आता कर्पुरार्तीची वेळ होती. आपल्या हातातली आरती खाली ठेऊन पुरोहितांनी कर्पुरार्ती हातात घेतली आणि शांत स्वर ऐकू लागले, "जटा टवी गलज्जलप्रवाह पावितस्थले गलेऽव लम्ब्यलम्बितां भुजंगतुंग मालिकाम् ।" ते शिव तांडव स्तोत्र होते, हळूहळू स्तोत्राचा वेग वाढत होता आणि आपल्या धमन्यांतून वाहणारे रक्त नेहमीपेक्षा जास्त वेगाने वाहत असल्याचा भास होत होता. हे स्तोत्र मला पाठ आहे, पण तिथली म्हणण्याची लय इतकी सुरेल होती की ते ऐकत राहावंस वाटत होतं.



तांडव स्तोत्राची सुरुवात आणि शेवट अतिशय संथ झाली. पण संपूर्ण स्तोत्र इतकं सुरेख म्हटलं होतं की, रावणाने सुद्धा काय म्हटलं असेल?

आता गंगा स्तोत्राची वेळ होती. गंगा स्तोत्र म्हणत असताना पुरोहितांनी मोरपिसांचा झाडा सुरू केला, आणि नंतर शंखनाद...!!! पाच मधुर शाखांचा एकाच सुरात नाद येत होता. ब्रह्मनाद म्हणतात तो हाच असावा बहुतेक...नंतर सर्वांना पुष्पांजली वाटण्यात आली आणि भगवान शकरांचे भजन सुरू झाले. आम्ही सर्वजण मोठ्या उत्साहात भजन गात होतो आणि तिथे आलेल्या परदेशी पर्यटक आम्हा भारतीयांकडे स्तिमित होऊन बघत होते. सुमारे दहा मिनिटांच्या भजनानंतर पुष्पांजली गंगार्पण करायला सांगण्यात आले आणि "नमः पार्वतीपते हऽऽर हऽऽर महादेऽऽव" च्या जयघोषात आसमंत दणाणून गेले.

आपण रोज आयुष्य जगत असतो. पण नेमके काही सुखाचे आणि दुःखाचे क्षणच आपल्याला आठवत असतात. मेंदू रिकाम्या आठवणींचे ओझे लक्षात ठेवत नाही आणि माझ्या मते यालाच आयुष्य म्हणतात. त्यात आज आणखी एका आनंददायी आठवणीची भर पडली होती आणि ती पुसली जाणार नव्हती. काही मंडळी रिव्हरफ्रंटने आरतीचा आनंद घेत होती. माझ्या शेजारील फ्रेंच युवकाचा मला विलक्षण हेवा वाटत

होता. एका हातात त्याने कॅमेरा सेट केला होता. दुसऱ्या हातात मोबाईलने कुणालातरी व्हिडिओ कॉल केला होता आणि तो या दोघांवर लक्ष ठेऊन मिळालेल्या वेळेत आरतीचा आनंद घेत होता. सुमासे साडेसात वाजले होते आणि अस्सी घाटाचे हे रुप विलोभनीय होते. आरतीनंतर भाविकांची नदीत अर्पण केलेल्या दिव्यांमुळे आकाशातील तारे गंगेत उतरल्याचा भास होत होता. आकाशमंडळातील ताऱ्यांना गंगेतल्या ताऱ्यांचा हेवाच वातर होता. पण गंगेच्या पाण्यात आपलेच प्रतिबिंब पाहून ते मनाची समजूत घालत होते. हळूहळू घाटावरील गर्दी कमी होत होती.

दुपारी पोटभर खाल्यामुळे विशेष भूक नव्हती. त्यामुळे मी जवळच असलेल्या मोनालीसा कॅफेला जायचे ठरवले. तिथे ब्राऊनी ऑर्डर केली, अजून बरेच ऑप्शन होते पण जास्त भूक नसल्यामुळे ब्राऊनीच घेतली. ब्राऊनीची चव छान होती आणि येथील मेन्यूकार्ड वरील मोनालीसाला भारतीय पध्दतीने सजविले होते. तिथून बाहेर पडल्यावर मला अचानक थंडाईची आठवण झाली. वाराणसीत आल्यावर थंडाई न पिणे म्हणजे वरणभातात तूप न घेण्यासारखे होते. ‘बाबा थंडाई’ या प्रसिद्ध दुकानात मी गेलो. तिथे त्याने मला एकच प्रश्न विचारला, “भांगवाली या साधी ?” मी आश्चर्यचकित होऊन बघतच राहिलो, कारण तिथे जवळजवळ

सर्वांनीच थंडाईमध्ये भांग घेतली होती. मी त्याला “साधी” असे सांगून आजूबाजूची गंमत बघत बसलो. येणारा जवळपास प्रत्येकजण भांगयुक्त थंडाई घेत होता. माझी थंडाई आली. वातावरणात गारवा असताना थंडगार थंडाई पिण्याची मजाच काही और होती. विशेष म्हणजे थंडाई हा पदार्थ मी पहिल्यांदाच घेत असल्यामुळे उत्सुकता तर होतीच. साडेनऊचा सुमार झाला होता. मी रूमवर आलो आणि माझी ओळख माझ्या दोन नवीन मित्रांशी झाली. हॅरीसन (Harrison) आणि सॅम्युअल (Samuel) हे दोन अमेरिकन तरुण माझ्या रूममध्ये आले होते. Dormetry मध्ये माझ्या बेडच्या खालीच दोघांनी बुक केले होते. मी रूममध्ये जाताच त्यांनी हसत माझे स्वागत केले, जणू काही आम्ही कधीपासून मित्र आहोत. परदेशी लोकांची ही एक गोष्ट चांगली आहे. नाहीतर आपल्याकडे माणसाला बघून दुर्लक्ष करतात. असो, हॅरीसन हा फ्लोरिडा राज्यातील कुठल्याश्या गावातील होता. त्याचे वडील पेशाने वकील होते. तो कॉमर्स मध्ये शिक्षण घेत होता. सॅम्युअल हा कधीकाळी रशियाच्या असलेल्या अलास्का प्रांतातील होता. त्याच्या परिवाराचा बेकरी प्रॉडक्ट्सचा व्यवसाय होता. तोदेखील परिवाराला पुढे मदत म्हणून फूड टेक्नॉलॉजीचं शिक्षण घेत होता. दोघेही भारतातच भेटले होते. सुट्टीनिमित्त चार महिन्यांच्या पर्यटनासाठी ते भारतात आले होते. रात्री

त्यांच्यासोबत बऱ्याच गप्पा वगैरे झाल्या. त्यांच्यासोबत झालेल्या त्या तास-दीड तसच्या गप्पांनी त्यांनी माझ्यासमोर भारत विश्वगुरु का आहे हे आजाणतेपणाने सांगितलं. सॅम्युअलला भारतभूमी त्याची “ऑक्सफर्ड” वाटत होती. त्याचं कारण म्हणजे भारतातली अन्न विविधता. त्याचा भारतात येण्याचा उद्देशच वेगळा होता. त्याला भारतीय जेवणाने भुरळ घातली होती. भारतीय पाकशास्त्राचे प्रचंड व्हिडिओ बघून तो भारतात आला होता. इथून पुढे तो दक्षिण भारतात जाणार होता. मला त्याचे विचार आणि जिद्द बघून विचार करायला भाग पाडले. लोकं विदेशातून आपले पदार्थ शिकण्यासाठी येतात आणि आपण मात्र फास्ट फूड वगैरेचे चाहते आहोत. दूध-हळद आपण (म्हणजे आमच्याकडे तरी) लहानपणापासून घेतो. त्याचे फायदे माहीत आहेत. पण बहुसंख्य भारतीय ह्या दुधाचं नाव ऐकून नाक मुरडतात. पण आता अमेरिकेने संशोधन करून त्याचे फायदे सांगितल्यावर आम्ही घेऊ, अमेरिका घेतेय ना. मग ठीक आहे. चांगलं असेल. ही विचारसारणी बदलायला हवी. असो, हॅरीसन वाराणसीहून केदारनाथ जाणार होता, पुढे दिल्ली आणि थेट अमेरिका.

सॅम्युअलला भारतविषयी खूप मोठ्या प्रमाणात आदर, प्रेम, उत्सुकता आणि बरंच काही होतं हे त्याच्या बोलण्यावरून समजलं. सॅम्युअल हृषीकेशहून वाराणसीला आला होता. नंतर तो राजस्थान, हिमाचल आणि मग नेपाळला जाणार होता. तो आधी मुंबईला आला होता. एकूणच भारतात येण्याचा त्याचा उद्देश सफल झाला. त्याने फिरलेल्या प्रत्येक शहरातून एक वस्तु विकत घेतली होती.

त्यांच्यासोबत UNO खेळायला खूप मजा आली. तब्बल दोन वर्षांनंतर मी UNO खेळत होतो. पुण्याला शिक्षणासाठी असताना रुममेट्स सोबत परीक्षेच्या आदल्या रात्री UNO खेळण्याची मजा काही औरच होती. आमच्या रूममध्ये आमच्या तिघांव्यतिरिक्त अजून एक जण होता. तीशीच्या घरात असेल बहुतेक.  तो काहीच बोलला नाही. अंतर्मुख प्रकारचा व्यक्ती असावा बहुतेक. दिवसभर फिरल्यामुळे कमालीचा थकलो होतो त्यामुळे बेडवर आडवं होताच निद्रादेवीच्या आधीन झालो.

तिसरा आणि शेवटचा दिवस उजडण्याआधीच मी पाच वाजता उठलो. बाकी मंडळी झोपली होती. साडेपाच वाजता तयार होऊन “सुबह - ए – बनारस” कार्यक्रम बघायला निघालो. सामान्यपणे सकाळी पाच वाजता सुरू होणारा हा कार्यक्रम हिवाळ्यामुळे साडेपाच ला सुरू होतो. आज तेथे मूळ कर्नाटकच्या असलेल्या पण मुंबईत स्थायिक झालेल्या गायिका आल्या होत्या. मला त्यांचे नाव या क्षणाला आठवत नाहीये. त्यांनी कानडी तसेच मराठी गायकीचे शिक्षण घेतले आहे. सुमारे एक ते सव्वा तास त्यांनी अप्रतिम भजनं, बंदिशी, रचना गायल्या. उत्तर प्रदेशातील वाराणसीत महाराष्ट्रातील गायिका कानडी पद्धतीने गात होत्या. हीच भारताची खरी खासियत आहे – “विविधतेत एकता.” गंगा किनारी सकाळचा थंड वारा..., मंत्रमुग्ध करणारे संगीत... असे ते वातावरण खरंच भारावून टाकणारे होते. इतक्यात सूर्योदय झाला. तरीही गंगा तटावर धुक्याची चादर होती. एक बाजूने पाहिल्यास सम्पूर्ण वाराणसी धुक्यात हरवलेले दिसते. ते दृश्य अतिशय छान दिसते. दुपारी बारा वाजेपर्यंत धुके हळूहळू विरते. सुबह - ए - बनारस कार्यक्रमाची सांगता झाल्यावर तिथे योगासनांचा कार्यक्रम असतो. तत्पूर्वी कार्यक्रमास हजेरी लावणाऱ्या मान्यवरांपैकी उत्तर प्रदेशच्या स्थानिक गायिका सौ. अग्रवाल यांनी आग्रहाखातर ब्रज भाषेतील एक छोटंसं कडवं सादर केलं.

त्यांच्या मुलाच्या पदवीप्रदान समारंभासाठी त्या आल्या होत्या. त्यांच्या मुलाला सांभाळून घेतल्याबद्दल श्री काशी विश्वेश्वर आणि समस्त वाराणसीचे त्यांनी आभार मानले नंतर मुळ बनारसी असलेले पण कामानिमित्त दिल्लीत स्थयिक झालेले श्री मिश्राजी आले होते. ते डिस्कव्हरी चॅनलचे हेड आहेत. त्यांनी लहानपणाच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, “शाळेतून आल्यावर अस्सी घाटावर खेळयचो तेव्हा इथे काहीच नव्हतं. माझं बालपण इथंच गेलं, पण आज या घाटाचा चेहरा पुर्णपणे बदलून टाकला आहे, त्याबद्दल धन्यवाद. देव दीपावलीच्या निमित्ताने बऱ्याच वर्षांनी वराणसीत येण्याचा योग आला. पण एका गोष्टीची खंत आहे, आमचं लहानपणीचं शिवाला मधलं घर आता नाहीये, त्या घराशी कितीतरी आठवणी आहेत.” एवढं बोलून ते थांबले. नंतर कुठल्यातरी मासिकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर कार्यक्रम समितीतर्फे तमाम देशवासियांना शांततेचे आवाहन करण्यात आले. कारण बहुचर्चित ऐतिहासिक अयोध्या राम मंदिर खटल्याचा आज निकाल होता. योगासने सुरू झाली तशी परदेशी पर्यटकांची संख्या वाढली. परदेशी लोकांना मांडी घालून बसता येत नसावे बहुतेक, कारण त्या दिवशी विश्वनाथ मंदिरातील

पर्यटक आणि आताचे हे लोकं बसण्याची सारखीच पद्धत होती. योगासन आणि नंतर प्राणायाम व शेवटी हास्यासनाने कार्यक्रमाची सांगता होते.

सुबह ए बनारस बघताना – ऐकताना मला खरंच भरून आलं होतं. आता नक्की आठवत नाही कुणी म्हटलंय पण ते शत – प्रतिशत खरं वाटलं, अगदी सोन्याहून पिवळं....

“वैसे तो हर जगह की सुबह आपना एक अलग अंदाज लेकर आती है,

पार बनारस मे दो सुबह होती है, एक जो पूर्वाकाश में होती है और दुसरी हृदयाकाश में.....”

ऐतिहासिक दिवसाची अविस्मरणीय सुरुवात करून मी मार्गस्थ झालो. आज दशाश्वमेध घाट ते अस्सी घाट फिरण्यासाठी दुपारी बारा वाजेपर्यंत वेळ होता. मी फिरत-फिरत अहिल्या घाटावर आलो. १७८५ माघे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी हा घाट बांधला. तत्पूर्वी हा घाट केवलगिरी घाट म्हणून ओळखला जात होता. येथेच अहिल्याबाई यांचा वाडादेखील आहे. पुढे मुंशी घाट होता. त्याचे निर्माण नागपूर येथील श्री श्रीधर मुंशी यांनी १८१२ मध्ये केले. याला छोटे बंदर म्हणण्यास हरकत नाही कारण येथे नाविक मोठ्या

संख्येने आपापल्या होड्या बांधत असतात. या घाटाला लागूनच असलेला दरभंगा घाट हा मुंशी घाटाचाच एक भाग होता. पण १९२० मध्ये बिहारच्या राजाने हा भाग विकत घेतला आणि प्रस्तुत घाट दरभंगा घाट नावाने ओळखला जाऊ लागला. विशेष धार्मिक महत्व नसल्याकारणाने येथे स्नानासाठी कमी गर्दी असते. पुढचा घाट होता - राणा महल घाट, उदयपूरचे राजे जगत सिंह यांनी सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात १७६५ मध्ये घाटाचे निर्माण केले. येथे राजस्थानी स्थापत्यशैलीचा सुंदर नमुना पहायला मिळतो. पुढे चौसट्टी घाट आहे. बंगालचे राजे प्रतापादित्य यांनी सोळाव्या शतकात या घाटाचे बांधकाम केले होते. येथे चौसष्ट योगिनींचे मंदिर प्रसिद्ध आहे. मंदिराचे बांधकाम नविन असले तरी धार्मिकदृष्ट्या महत्वाचे आहे. याला लागूनच दिग्पतिया घाट घाट आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीस बंगालच्या दिग्पति नावाच्या राजाने हा घाट बांधला. घाटावरील महालाचे नक्षीकाम बंगाली कलाकुसरीची साक्ष देते.

पुढे पांडे तथा बाबुआ पांडे घाट आहे. हा घाट छपरा येथील याच नावाच्या व्यक्तीने बांधला. येथे कपडे धुण्याची परंपरा आहे, त्यामुळे वाराणसीतील धोबी येथेच कपडे धुतात. धार्मिकदृष्ट्या महत्त्व कमी असल्याने स्नानार्थींची गर्दी कमी असते.

कधीकधी प्रवासात किंवा अनोळखी ठिकाणी अशा काही अकल्पित गोष्टी घडतात की ज्यांच्यामुळे आपल्याला घाबरायला होते. पण त्या घटनांमुळे आपला पूर्वपार असलेला दृष्टीकोन बदलून जातो. कायमचाच. तर झाले असे की, बबूआ पांडे घाटाच्या पुढे राजाघाट होता. याची निर्मिती पेशवे अमृतराव पटवर्धन यांनी केली होती. येथे अन्नछत्र चालते. माझी अमृतराव पेशवा हवेली बघण्याची फार इच्छा होती पण हवेलीच्या चारही बाजूने पाहूनही कुठेच आत जायला जागा दिसत नव्हती. मी याविषयी भरपूर वाचलं होतं त्यामुळे तीव्र कुतूहल होतं. आजूबाजूच्या स्थानिक लोकांना विचारले पण त्यांनाही काही माहिती नव्हते. तरी मी हवेलीमध्ये जाण्याचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला आणि येथेच चूक झाली. मोबाईलचा जीपीएस सिग्नल लॉस्ट झाला. मी परत एकदा रस्ता भरकटलो. पण यावेळी परिस्थिती वेगळी होती. या भागात बहुसंख्य मुस्लिम बांधव होते आणि मी तिथल्या तिथे फिरत होतो. फिरून परत त्याच जागेवर येत होतो. थोड्या-थोड्या अंतरावर मशिदी दिसत होत्या. रस्ता सांगण्यासाठी देखील कुणी नव्हते. राम मंदिराचा निकाल लागल्यावर मिळणारा प्रतिसाद कसा असेल हे कुणीच सांगू शकत नव्हते. पण इथले वातावरण मात्र शांत होते. किंबहुना नित्यनियमाने रोजची कामे चालली होती. जणूकाही त्यांना निकालाशी काही देणंघेणं नव्हतंच.

अयोध्या देखील जवळच होती, त्याचे लोण पसरण्यास वेळ लागणार नव्हता. तिथं शांतता असली तरी दंगल उसळायला वेळ लागत नाही हे मी जाणून होतो. मी एकटाच, त्यात अशा दिवशी, अशा भागात म्हणजे खरंचं कठीण काळ होता. माझं रस्ता भटकणं माझ्या अंगलट येतं की काय असं वाटत होतं. मी त्या आपत्तीचे चिंतन करीत होतो तोच मला केदार घाटाकडे जाण्याचा मार्ग दिसला आणि मी निश्चींत झालो. केदार घाट ते राजा घाट यांत माझे दोन - तीन घाट सुटले होते. त्यात एक “नारद घाट” होता. हे एक बरं झालं, कारण असं म्हटलं जातं की नारद घाटावर शक्यतो जाऊ नये आणि गेलात तर तिथे असलेल्या नरदाच्या मंदिरात दर्शन करू नये. कारण पुराणकथांमध्ये नारद मुनींचा उल्लेख कळीचा नारद असा केलेला आहे. त्यामुळे इथे दर्शन केल्यावर घरी भांडणं होतात असा समाज जनसामान्यांत प्रचलित आहे. मला स्पष्टपणे आठवतंय की, मी मागच्या वेळी आलो तेव्हा आजीने मला या घाटावर न जाण्याविषयी आवर्जून सांगितलं होतं आणि या वेळी सुद्धा. तुम्ही या प्रकरला अंधश्रद्धा म्हणा किंवा अजून काही. पण आपले पूर्वज काही दूधखुळे नव्हते. जर सोन्याचा धूर निघत असलेल्या भारताच्या जडणघडणीत त्यांचा वाटा होता तर त्यामागे काहीतरी विज्ञान असतंच असतं.

पराधर्माच्या आक्रमणामुळे म्हणा किंवा काळाच्या ओघात म्हणा, ते एकतर चोरून नेलं किंवा आपल्या मनावर हे चुकीचं आहे असं बिंबवलं गेलं.

केदार घाटावरील मंदिर हे काशीच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे असे म्हणतात. त्यामुळे घाटाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. येथे बऱ्यापैकी गर्दी असते.

पुढे हरिश्चंद्र घाट आहे. आपल्या सत्य बोलण्यासाठी सम्पूर्ण भारतवर्षात प्रसिद्ध असलेल्या राजा हरिश्चंद्र यांची कथा याच ठिकाणी घडली असे सांगितले जाते. त्रेता युगातील हरिश्चंद्र हे अयोध्येच्या इश्वांकू वंशीय ३७ वे राजे होते.त्यांच्या कार्यकाळात सुख,शांतता आणि समृद्धी राज्यात नांदत होती. चक्रवर्ती सम्राट सागर हरिश्चंद्राच्या नंतरच्या १३ व्या पिढीतले. त्यनाची कहाणी काही अशी आहे, -

एकदा राजा हरिश्चंद्र आपली राणी तारामती आणि मुलगा रोहित सह शिकारीला गेले होते. तुटे त्यांना एका महिलेच्या रडण्याचा आवाज येतो. ते तिथे जातात तेव्हा समजते की ते एक मृगजळ होते. तेव्हा

विश्वामित्र ऋषींची तपश्चर्या भंग कारणासाठी ‘विघ्नराज’ राजाच्या शरीरात प्रवेश करतो. तेव्हा विश्वामित्र ऋषींची तपस्या भंग होते आणि त्यांनी त्या द्वारे मिळवलेलं सर्व ज्ञान सुद्धा नष्ट होतं. जेव्हा हरिश्चंद्र भानावर येतो तेव्हा त्याला आपल्या करणीचा उलगडा होतो. तो ऋषींची माफी मागतो. तेव्हा तेव्हा विश्वामित्र त्याला आपल्या राजसूय यज्ञा साठी दान मागतात. राजा हरिश्चंद्र तात्काळ  आपलं सर्व ऐश्वर्य ,साम्राज्य गुरू विश्वामित्रांना दान करतो ,अगदी स्वतःचे वस्त्र सुद्धा! त्यानंतर जेव्हा राजा आपल्या कुटुंबासह जाण्यास निघतो तेव्हा गुरू विश्वामित्र अजून संपत्ती दान करण्याची मागणी करतात. तेव्हा निराश राजा हरिश्चंद्र त्यांना सांगतात की, “जे काही होतं ते सर्व मी दान करून टाकलं आहे. कृपया मला एक महिना द्यावा त्या नंतर परत मी काही धन दान म्हणून देऊ शकेन.” नंतर आपल्याच राज्यात अत्यंत हालाखीत हरिश्चंद्र आणि त्याचा परिवार राहत असतो. यथावकाश महिना उलटतो, आता उद्या गुरुंना दान देण्यासाठी धन कुठून आणायचं? या विवंचनेत राजा पडतो. तेव्हा त्याची पत्नी स्वतःच्या विक्रीचा प्रस्ताव समोर ठेवते जेणेकरून काही धन गुरूंना दान देता येईल. शेवटी काही पैसे घेऊन रोहित ला सुध्दा आई सोबत विकण्यात येतं. दुसऱ्या दिवशी विश्वामित्र येतात

आणि दानाची मागणी करतात. राजा त्यांना पत्नी आणि मुलगा विकून आलेलं सर्व धन देऊन टाकतात तरी सुद्धा विश्वामित्रांच समाधान होत नाही!

ते अजून दानाची मागणी करतात. मग कफल्लक राजा हरिश्चंद्र शेवटी स्वतःला विकायचं ठरवतो. तेव्हा चांडाळ देवता राजाला विकत घेण्याची इच्छा व्यक्त करतो. राजा या गोष्टीला नकार देतो. तेव्हा विश्वामित्र ऋषी राजाला विकत घेऊन चांडाळाला विकतो. चांडाळ हरिश्चंद्राला घेऊन आपल्या राज्यात येतो आणि त्याची स्मशानात कामासाठी नियुक्ती करतो. तिथे येणाऱ्या प्रत्येक मृतदेहाचे दहन करण्यासाठी तो लोकांकडून काही पैसे घेण्याचा आदेश देतो. या पैश्यातील एक हिस्सा चांडाळ ,दुसरा हिस्सा तिथल्या राजाला आणि राहिलेला हिस्सा हरिश्चंद्राला मिळणार असतो. हरिश्चंद्र स्मशानातील नेमून दिलेलं काम करून आपलं जीवन व्यतीत करत असतो. एके रात्री त्याला स्वप्नात आपली पत्नी रडताना दिसते झोपेतून जागा होऊन पाहतो तर खरंच त्याची पत्नी रडत असते. तिच्याजवळ सर्पदंशाने मृत्यू झालेला त्यांचा एकुलता एक मुलगा असतो. हरिश्चंद्र दुःखाने वेडा-पिसा होतो आणि आत्महत्येचा विचार करतो मात्र आपली पापं आपल्याला पुढच्या जन्मी सुद्धा भोगावी लागतीलच या विचाराने तो भानावर येतो. राणी तारामती आपल्या

मृत मुलाचे अंत्यसंस्कार त्या स्मशानात करण्यास तयार होते परंतु, पैसे दिल्याशिवाय रोहित चे अंत्यसंस्कार इथे होणार नाहीत या भूमिकेवर हरिश्चंद्र ठाम राहतो. त्याची वचनबद्धता पाहून सर्व देव प्रसन्न होऊन तिथे प्रकट होतात. राजा हरिश्चंद्राच्या सत्यवचनी स्वभावाची स्तुती करून ते त्याला स्वर्ग लोकी येण्याचे निमंत्रण देतात. पण आपल्या प्रामाणिक सेवकांशिवाय एकटा स्वर्गात जाण्यास तो तयार होत नाही.

हा असा प्रचंड जुना आणि जाज्वल्य इतिहास आहे भारतवर्षाचा...

हे काशीतील दुसरे स्मशान आहे. येथेदेखील शव दहन होत असते. राजा हरिश्चंद्र आणि त्यांची पत्नी तारामती यांचे मंदिर तिथे बांधले आहे. मंदिराचे दर्शन घेतले आणि प्रार्थना केली की, हे राजा हरिश्चंद्र, तुझ्यातला सत्य बोलण्याचा थोडासा अंश तरी माझ्यात आयुष्यभर राहू दे.

घाटाजवळच कमकोटीश्वर शिव मंदिर आहे. दक्षिण भारतीय शैलीत बांधलेले हे मंदिर अतिशय सुरेख आहे. या घाटाललागूनच हनुमान घाट आहे. असे म्हटले जाते की या घाटावरील हनुमान मंदिराची स्थापना गोस्वामी तुलसीदास यांनी केली आहे. या घाटावर नागा साधूंचा आखाडा आहे. या घाटाच्या पायऱ्यांबद्दल सांगितले जाते की, ‘नन्दादास’ या वाराणसीतील जुगाऱ्याने आपल्या एका दिवसाच्या जुगाराच्या पैशांनी या

पायऱ्या बांधल्या आहेत. येथे दाक्षिणात्य भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. तसेच घाटाच्या मागच्या बाजूला भरपुर दाक्षिणात्य धर्मशाळा आहेत. पुढे शिवाला घाट आहे. या घाटाची निर्मिती अठराव्या शतकातील तत्कालीन काशी नरेश बळवंत सिंह यांनी केली. या घाटावरील काशी नरेशांनी बांधलेल्या ब्राम्हेंद्र मठात दक्षिण भारतीय बांधवांची रहाण्याची सोय आहे. पुढचा घाट होता - श्री निरंजनी घाट. या घाटावर नागा साधूंचे वास्तव्य असते. मी आखड्यातील कुस्त्यांचा सराव पहायला गेलो पण खूप उशीर झाला होता. पुढे चेतसिंह घाट आहे. घाटाच्या पायऱ्यांवर एक चित्रकार घाटाचे सुंदर चित्र काढत बसला होता. याचे निर्माण काशी नरेश बळवंत सिंह यांनी केले. त्यांच्या पूर्वजांचे - चेतसिंह यांचे नाव या घाटाला दिले. काशी नगरीच्या ऐतिहासिक दृष्टीने हा घाट अतिशय महत्त्वाचा आहे. सन १७८१ मध्ये वॅरेन हेस्टिंग आणि चेतसिंह यांचे युद्ध याच किल्ल्यावर झाले. यात चेतसिंह यांचा पराभव झाला आणि किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. तदनंतर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महाराज प्रभुणारायण सिंह यांनी किल्ला इंग्रजांकडून पुन्हा प्राप्त करून घेतला आणि अर्धा भाग नागा साधूंना दान केला. पुढे मी तुलसी घाटावर आलो. श्रीं तुलसीदास यांनी येथे रामचरित मानस ग्रंथाचे काही खंड येथे लिहिले. येथे त्यांचे घर देखील आहे आणि

येथेचं ते ब्रम्हानंदी लिन झाले होते. पुढचा आणि माझ्या नियोजनातला शेवटचा घाट होता - अस्सी घाट. वारणा नदी आणि अस्सी घाट यांमुळे या महानगरीला वाराणसी नाव पडले. येथे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात बांधलेले लक्ष्मी नारायण मंदिर पंचयातन शैलीत बांधले आहे. तसेच यात नागर शैलीचा परभणी देखील आहे. सुबह ए बनारस, गंगा आरती तसेच विविध कार्यक्रमांमुळे या घाटाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. इथून मी सरळ लंकेकडे निघालो.

रविदास गेट मधून वळल्यावर “केशव तांबूल भांडार” लागते. वाराणसीत आल्यावर पान नाही खाल्ले म्हणजे काय ? वाराणसी तिच्या धार्मीकतेइतकीच पानां साठी प्रसिद्ध आहे. सुमारे पंधरा मिनीटांनी माझा नंबर आला. मी पान खात नाही पण वाराणसीत आल्यावर हा मोह आवरता आला नाही. प्रचंड मोठे ते पान अतिशय स्वादिष्ट होते. केशव पान भंडार हे त्यांच्या गोड पानांसाठी प्रसिद्ध आहेत. तब्बल ५६ वर्षांपासून ते अव्याहतपणे ग्राहकांची हौस भागवत आहेत. २०१४ च्या प्रचाराच्या वेळी श्री नरेंद्र मोदींनी तिथलं पान खाल्लं होतं. म्हणजे असा फोटो तिथं लावला होता आणि मी विचारल्यावर त्यांनी तसं सांगितलं. त्या दुकानाचे मालक श्री राजेंद्र चौरसिया यांना मी धन्यवाद दिले आणि तेथील काही स्थानिक व्यक्तींना मी रोज किती पान खातात? असे विचारले असता त्यांनी दिलेली उत्तरे आश्चर्यचकित करणारी होती. काही दहा, काही पंधरा तर काही वीस पानं दिवसाला खातात. बनारसच्या प्रत्येक ठिकाणच पान सारखंच लागतं असं म्हणतात. ते मोठे आणि गोड पान चघळत मी संकटमोचन हनुमान मंदिराचा रस्ता धरला. मंदिरात मोबाईल घेऊन जाता येत नाही. गेटवर मोबाईल जमा करुन आत गेलो. आत गेल्यावर बरीच हिरवळ आणि झाडं आहेत. शनिवार असल्याकारणाने बरीच गर्दी होती.

केशव तांबूल भंडार





इथली पद्धत अशी आहे की आधी श्री मारूतीरायांचे दर्शन घ्यायचे आणि नंतर मंदिरासमोर असलेल्या कोडंडधारी श्रीराम, लक्ष्मण आणि सीता मातेचे मंदिर आहे, तिथलं दर्शन घ्यायचं. सुमारे अर्ध्या तासाने दर्शन झालं. येथे श्री तुलसीदास स्वामींचा वास असायचा. येथील कंदी पेढे फार प्रसिद्ध आहेत. हे पेढे बघून माला भद्रा मारुतीच्या इथल्या पेढ्यांची आठवण झाली. येथून पुढे मी बनारस हिंदू विद्यापीठाकडे निघालो. गेटकडे जातानाच माहिति मिळाली की अयोध्या प्रकरणी निकाल आपल्या बाजूने लागला आहे.

आज सकाळपासूनच नगरात पोलिस बंदोबस्त प्रचंड प्रमाणात वाढवला होता. निकाल लागल्याचे सर्वांना माहीत होते, पण कुठेही जल्लोष नव्हता की आरडाओरड नव्हती. आपल्या बाजूने निकाल लागल्याचा आनंद फक्त होता. विद्यापीठाच्या गेटबाहेर एक व्यक्ती निकालाच्या आनंदात मिठाई वाटत होता. तो अक्षरशः लोकांना ओरडून हाका मारत होता आणि मिठाई देत होता. निकाल मंदिराच्या बाजूने

लागल्याचा मलासुद्धा खूप आनंद झाला होता. याचं कारण धर्मांधता मुळीच नाही. जे सत्य आहे तेच शाश्वत आहे आणि उशिरा का होईना सत्याला न्याय मिळतो याची प्रचिती आली.

विद्यापीठ गेटच्या आत अडीच किलोमीटर अंतरावर बिर्ला मंदिर आहे. यालाच नवीन विश्वेश्वर मंदिर म्हणतात. या मंदिराची निर्मिती बिर्ला ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजने केली आहे. या मंदिराची मूळ संकल्पना बनारस हिंदू विद्यापीठाचा एक भाग म्हणून विद्यापीठाचे संस्थापक श्री मदन मोहन मालविय यांची होती. सभोवताचे उद्यान खूप छान पद्धतीने सजविले आहे. बनारस हिंदू विद्यापीठाच्या आवारात सुमारे नऊ मंदिरं आहेत. विद्यापीठ आवारात भारत कला भवन हे एक इतिहासाची आवड असणाऱ्यांसाठी एक मोठे संग्रहालाय आहे. यात लाखांपेक्षा जास्त ऐतिहासिक वस्तू, नाणी, भांडी, दुर्मीळ हत्यारे, प्राचीन दस्तऐवज ठेवले आहेत. संग्रहालयात फिरताना एक तास कधी गेला तेच कळले नाही. सकाळपासून बरेच फिरल्यामुळे प्रचंड प्रमाणात भूक लागली होती. समोरच ओम कॅफे मध्ये छोले - भटुरे आणि कोल्ड कॉफी घेतली. कोल्ड कॉफी फक्त कोल्ड होती. थिक वगैरे नव्हती. इथे माझा थोडा भ्रमनिरास झाला. शांतपणे काही वेळ बसून राहिलो. तिथं निकलच्या बातम्या सुरू होत्या. आता ट्रिपचा शेवटचा टप्पा होता. खूप थकून गेलो होतो, पण थकवा काय

रेल्वेतसुद्धा काढू शकणार होतो. हे क्षण पुन्हा जागता येणार नव्हते. त्यामुळे आळस झटकून उठलो आणि मार्गाला लागलो.

आता मला बनारसी साड्या जिथे बनविल्या जातात तिथे जायचे होते. अध्यात्म, पान, थंडाई, स्ट्रीट फूड, गल्ली, मंदिरे, इतिहास, संगीत, संस्कृत यासोबतच वाराणसी तिथल्या सिल्क साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. मी मदनपुरा या भागात साड्यांचे विणकाम बघण्यासाठी आलो. येथील बहुतांश विणकर मुस्लिम धर्मीय आहेत. हातमाग आणि यंत्रमाग यांचा प्रचंड आवाज होत होता. एका जणाला मी त्यांच्या व्यवसाय आणि दिनचर्येबद्दल विचारले. (मी त्यांचे नाव विचारायला विसरलो.) त्यांचे पुर्ण परिवार या विणकामात मदत करते. म्हातारे वडील हातमागावर सात दिवसांत एक साडी विणतात तर तीच साडी यंत्रमागावर चार तर पाच तासांत होते. इथल्या लोकांचे सर्व कुटुंब हे साड्यांच्या व्यवसायात गुंतलेले असते. पण एक गोष्ट इथे सांगावीशी वाटते की, इथे प्रचंड मोठ्या प्रमाणात हँडलुम आणि इतर मशीन्सचा आवाज अविरतपणे सुरू असतो. त्यामुळे कदाचित इथे येऊन साड्या बनविण्याची प्रोसेस बघणं हे एखाद्याला कंटाळवाणं वाटू शकतं. साड्यांसाठी लागणारे रेशीम जास्तकरून बंगलोरहुन येते. साडीची किंमत ही सुमारे दोन हजारांपासून सुरू

होते तर दोन लाखांपर्यंत साड्या उपलब्ध असतात. परदेशी पर्यटकांना या साड्यांनी फार भुरळ घातली आहे. तिथून जवळच असलेली 'ब्राऊन ब्रेड बेकरी' गाठली. ही एक जुनी आणि प्रसिद्ध बेकरी आहे. तिथे गार्लिक ब्रेड टेस्ट करून रूमवर आलो तेव्हा चार वाजले होते.

वाराणसीची ट्रिप आता शेवटच्या टप्प्यात होती. रूमवर आलो तेव्हा हॅरीसन आणि सॅम्युअल दुपारीच गेल्याचे समजले. मी देखील चेक-आऊट केले आणि अस्सी घाटावर आलो. लोकांची नेहमीप्रमाणे कामे चालली होती. सात वाजता मला निघायचे होते. शांतपणे अस्सी घाटावरील बाकावर बसलो आणि मागील तीन दिवसांची उजळणी करू लागलो. हा माझ्या प्रत्येक ट्रिपमधला आवडता टप्पा आहे. शांतपणे एका ठिकाणी बसून चिंतन करायचे. "ते दोघं अमेरिकन मित्र मला आयुष्यात कधीही भेटणार नव्हते. पण त्यांच्यासोबतच्या काही तासांनी मला विचार करण्याची एक वेगळी दिशा दिली होती. कितीतरी लोकं या तीन दिवसांत भेटले होते. त्यांच्याशी परत माझी भेट होणार नव्हती. ते तिचाकी सायकलवले काका, राम भंडार वाले राजेंद्रजी, संतमत वाले अनुयायी, पानवाले केशवजी, मला जेवणाचा आग्रह करणारे मराठी लोकं हे सर्व माझे कुणीच लागत नव्हते. मी त्यांना आयुष्यात पहिल्यांदाच पहिलं होतं. पण तरीही ते अगदी जवळचे

वाटले. आपल्या कामाव्यतिरिक्त पुढे जाऊन ते काहीतरी वेगळे होते. इथे हिंदू आहेत, मुस्लिम आहेत, नेपाळी, अमेरिकन, स्पॅनिश, आयरिश, रशियन अगदी चिनी सुद्धा. म्हणूनच की काय वाराणसी एक छोटे जग आहे. काळापेक्षाही जुने आणि इतिहासापेक्षा आधी असलेले हे महानगर जगभरातील पर्यटकांना म्हणूनच खुणावत असल्यास त्यात आश्चर्य वाटण्याचे काम नाही. असंख्य वेगवेगळया प्रकारची व्यक्तिमत्वे वाराणसीत घडली नव्हे वारणसीने ती घडवली त्यात कलियुगात संन्यासाश्रमाचा उपदेश करणारे श्री नृसिंह सरस्वती स्वामी, संत रामानंद, संत रविदास, गोस्वामी तुलसीदास, संत कबीर, स्वातंत्र्य सेनानी मदन मोहन मालवीय, असंख्य संस्कृतपंडित, लेखक मुन्शी प्रेमचंद, प्रसिद्ध संगीतकार असे असंख्य व्यक्तिमत्त्व आहेत."

"प्राचीन काळी वाराणसी नगरात ब्रम्हदत्त नावाचा राजा राज्य करत होता..., एके जन्मी बोधिसत्व वाराणसीच्या ब्राह्मण कुळात अवतारीत झाला होता.... लहानपणापासून बोधिसत्वाच्या जातक कथांमध्ये असं वाचत आलो होतो. ही तीच बोधिसत्वाची 'वाराणसी'नगरी होती."

"पवित्र गंगा शांतपणे आपल्यासोबत असंख्य जलबिंदू घेऊन समुद्रभेटीला निघाली होती. वर्षानुवर्षे ती अशीच वहात होती. प्राणदायिनी गंगा पावसाळ्यात मात्र संबंध घाट आपल्या अजस्त्र बाहूंनी गिळू पहाते

तेव्हा मात्र वाराणसीतील लोकांची त्रेधातिरपीट उडते. मागील वेळी आलो तेव्हा आठ नोव्हेंबरला नोटबंदी झाली होती आणि आज नऊ नोव्हेंबरला अयोध्या निकाल मंदिराच्या बाजूने लागला होता. या ऐतिहासिक घटनांचा मी वाराणसीत होतो हा केवळ विचित्र योगायोग होता. आणि त्या दिवशी मला भारताचा खरा अर्थ समजला. मी आज ज्या ठिकाणांतूनत फिरलो होतो त्यात बहूसंख्य मुस्लिम होते. निकाल त्यांच्या विरोधात लागला होता. तरीही शांतता होती. दोनचार दिवसांवर ईद येऊन ठेपली होती. मुस्लिम बांधवांची रोषणाई आणि सजावट चालली होती. हाच तो खरा एकसंध भारत होता. सर्वांना सामावून घेणारा.” असो,



साडेपाच झाले होते आणि मी वरच असलेल्या पिझ्झेरिया वाटिका कॅफे मध्ये गेलो. हा वाराणसीचा एक प्रसिद्ध कॅफे आहे. तिथला सर्वांत जुना कॅफे म्हणून या कॅफेला ओळखले जाते. १९९२ साली स्थापन झालेल्या कॅफेत एक वेगळाच अनुभव येतो. संध्याकाळी या कॅफेमध्ये जाण्याची वेगळीच मजा असते कारण समोरच गंगा वहात असते आणि विद्युत रोषणाई मुळे परिसर देखावा फार सुंदर असतो. म्हणजे आपल्या एका कानाला कॅफेतलं जॅझ संगीत ऐकू येतं आणि दुसऱ्या कानाला गंगा आरती. समोरची गंगा आणि डिशमधलं अप्रतिम अन्न. स्वर्गसुख वगैरे म्हणतात ते हेच असावे बहुतेक. तिथे एक

Apple Pie + Ice cream ऑर्डर केले. गरम आणि थंड यांचे मिश्रण असलेला तो पदार्थ मला खुप आवडला. Apple Pie + Ice Cream ही त्यांची खासियत आहे. काही वेळ तिथं बसण्याची इच्छा होती, पण आता वेळ नव्हता. बिल चुकते करून निघालो आणि घाटावर एक नजर फिरवली. सर्व वाराणसी आठवण्याचा प्रयत्न केला कारण नंतर आठवण्यासाठीसुद्धा वेळ भेटणार नव्हता. रिक्षास्टॉप वर आलो आणि परत एकदा, "वाराणसी जंक्शन चलोगे ?"

दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला..." सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. ज्या वाटेवर फिरण्यात तुम्हाला आनंद वाटतो तो वाटेचा आनंद वाटेल तेव्हा वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com